Kudumbashree National Resource Organisation

उमेद
क्षितिज नवे, विश्वास नवा...

# यशोगाथा

## पंचायत राज संस्था (PRI) आणि समुदाय आधारित संस्था (CBO) अभिसरण (कृतिसंगम) प्रकल्प



# प्रस्तावना

PRI-CBO कृतिसंगम प्रकल्प हा ग्रामस्तरावरील स्थानिक स्वराज्य संस्था (PRI) आणि समुदाय आधारित संस्था (CBO) यांच्यात प्रभावी समन्वय निर्माण करून सहभागी, सर्वसमावेशक आणि शाश्वत स्थानिक शासन व्यवस्थेला बळकटी देण्यासाठी राबविण्यात आलेला महत्त्वपूर्ण उपक्रम आहे. महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियान (उमेद-MSRLM) आणि कुटुंबश्री NRO यांच्या संयुक्त सहकार्याने ७ नोव्हेंबर २०२३ रोजी या प्रकल्पाची सुरुवात करण्यात आली.

या प्रकल्पाचा मुख्य उद्देश ग्रामपंचायत स्तरावर सहभागी नियोजन प्रक्रियेला बळकटी देणे, समुदायाचा स्थानिक शासन प्रक्रियेमध्ये सक्रिय सहभाग वाढविणे आणि विविध विभागांमधील समन्वय मजबूत करणे हा आहे. प्रकल्पाच्या पहिल्या टप्प्यात १२ जिल्हे, २४ तालुके आणि १,९२२ ग्रामपंचायतींमध्ये प्रभावीपणे अंमलबजावणी करण्यात आली.

7

प्रकल्पांतर्गत जिल्हा संसाधन व्यक्ती (DRP), तालुका संसाधन व्यक्ती (BRP) आणि स्थानिक संसाधन व्यक्ती (LRP) यांची सक्षम यंत्रणा उभारण्यात आली. ग्राम सतत समृद्धी आराखडा (VPRP) तयार करणे, ग्रामपंचायत समन्वय समिती (GPCC), ग्राम संघ समन्वय समिती (VOCC) तसेच SMC, ALMSC आणि VHSNC यांसारख्या नागरिक समित्यांचे सशक्तीकरण करण्यात आले.

सर्व १,९२२ ग्रामपंचायतींमध्ये VPRP तयार करून सादर करण्यात आले. ५,००० पेक्षा अधिक नागरिक समित्यांचे प्रोफाइलिंग आणि बळकटीकरण करण्यात आले, ज्यामुळे शिक्षण, आरोग्य, पोषण आणि इतर मूलभूत सेवांमध्ये सकारात्मक सुधारणा दिसून आल्या. जिल्हा आणि तालुका स्तरावरील समन्वय बैठकींमुळे विविध शासकीय योजनांशी प्रभावी संलग्नता साधली गेली आणि VPRP मधील मागण्यांचे GPDP मध्ये समावेशन सुलभ झाले.

प्रकल्पामुळे ग्रामसभांमध्ये समुदायाचा सहभाग वाढला असून महिलांनी स्थानिक शासन प्रक्रियेत सक्रिय भूमिका घेतली आहे. समन्वय शिबिरे, श्रमदान आणि विविध सहभागात्मक उपक्रमांमुळे स्थानिक स्तरावर सेवा वितरण अधिक सुलभ, पारदर्शक आणि परिणामकारक झाले आहे.

विशेषतः इमर्शन ब्लॉक्समध्ये सातत्यपूर्ण मार्गदर्शन, समुदाय सहभाग आणि कुटुंबश्री NRO यांच्या मेंटरशिपमुळे संस्थात्मक क्षमता आणि समन्वय यंत्रणा अधिक मजबूत झाल्या. या प्रक्रियेमुळे ग्रामपातळीवर सहभागी विकासाची प्रभावी मॉडेल्स निर्माण झाली असून इतर क्षेत्रांसाठीही हा उपक्रम प्रेरणादायी ठरत आहे.

या यशोगाथा पुस्तिकेमध्ये प्रकल्पाच्या अंमलबजावणीदरम्यान मिळालेले अनुभव, शिकवणी, उत्तम पद्धती आणि परिणामांचा आढावा सादर करण्यात आला आहे. सहभागी आणि लोकाभिमुख ग्रामविकासासाठी PRI-CBO कृतिसंगम मॉडेल भविष्यातही मार्गदर्शक ठरेल, अशी अपेक्षा आहे.

# मनोगत

PRI-CBO कृतिसंगम प्रकल्प हा महाराष्ट्रातील ग्रामपंचायत स्तरावरील स्थानिक शासन व्यवस्थेत समन्वित, सहभागी आणि परिणामकारक बदल घडवून आणणारा एक महत्त्वपूर्ण उपक्रम ठरला आहे. महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियान (उमेद-MSRLM) आणि कुटुंबश्री NRO यांच्या सहकार्याने राबविण्यात आलेल्या या प्रकल्पाच्या पहिल्या टप्प्यात १२ जिल्हे, २४ तालुके आणि १,९२२ ग्रामपंचायतींमध्ये प्रभावी अंमलबजावणी करण्यात आली.

या प्रकल्पाच्या माध्यमातून स्थानिक स्वराज्य संस्था (PRI) आणि समुदाय आधारित संस्था (CBO) यांच्यातील कृतिसंगम अधिक सक्षम करण्यात आला असून ग्रामस्तरावरील नियोजन आणि निर्णय प्रक्रियेला एक नवे बळ प्राप्त झाले आहे.

प्रकल्पाच्या अंमलबजावणीदरम्यान विविध संस्थात्मक व्यासपीठांची उभारणी आणि सशक्तीकरण करण्यात आले. ग्रामपंचायत समन्वय समिती (GPCC), ग्राम संघ समन्वय समिती (VOCC) आणि विविध नागरिक समित्यांच्या माध्यमातून संवाद, समन्वय आणि सामूहिक नियोजनासाठी प्रभावी मंच उपलब्ध झाले. या प्रक्रियेमुळे ग्राम सतत समृद्धी आराखडा (VPRP) आणि ग्रामपंचायत विकास आराखडा (GPDP) यामध्ये समुदायाच्या गरजा अधिक प्रभावीपणे समाविष्ट करण्यात यश आले. जिल्हा व तालुका स्तरावर विविध विभागांच्या सक्रिय सहभागातून समन्वय बैठका आयोजित करण्यात आल्या, ज्यामुळे VPRP मधील मागण्यांचे विविध शासकीय योजनांशी प्रभावी संलग्नता साधली गेली. या कृतिसंगम प्रक्रियेमुळे स्थानिक स्तरावर नियोजन अधिक समन्वित, उत्तरदायी आणि परिणामकारक बनले आहे.

कुटुंबश्री NRO यांच्या सातत्यपूर्ण मेंटरशिपमुळे समुदाय आधारित संस्था (CBOS) अधिक सक्षम बनल्या असून ग्रामपंचायतींसोबत प्रभावी समन्वय साधण्याची त्यांची क्षमता मोठ्या प्रमाणात वाढली आहे. विशेषतः इमर्शन ब्लॉक्समध्ये झालेल्या सखोल कार्यामुळे संस्थात्मक परिपक्वता, भूमिकांची स्पष्टता आणि प्रक्रियात्मक स्थैर्य निर्माण झाले आहे. हे अनुभव आणि पद्धती राज्यातील इतर भागांसाठी मार्गदर्शक ठरत आहेत. या उपक्रमामुळे स्वयं-सहाय्यता गटातील महिलांचा सहभाग लक्षणीयरीत्या वाढला असून त्यांनी ग्रामसभांमध्ये सक्रिय भूमिका घेत स्थानिक शासन प्रक्रियेत आपला ठसा उमटविला आहे. विविध शासकीय योजनांविषयी जागरूकता वाढून लाभधारकांना सेवांचा अधिक प्रभावी लाभ मिळू लागला आहे. तसेच, समन्वय शिबिरांमुळे सेवा वितरण अधिक सुलभ आणि लोकाभिमुख झाले आहे.

ही यशोगाथा पुस्तिका प्रकल्पाच्या अंमलबजावणीतील महत्त्वपूर्ण अनुभव, शिकवणे आणि उत्तम पद्धतींचा दस्तऐवज आहे. या माध्यमातून पुढील विस्तार टप्प्यात कृतिसंगम प्रक्रियेला अधिक बळकटी देत राज्यातील अधिक ग्रामपंचायतींमध्ये सहभागी आणि शाश्वत विकास साधता येईल, असा विश्वास आहे.

**निलेश सागर, भा.प्र.से.**
**मुख्य कार्यकारी अधिकारी**
**महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियान**

# यशोगाथा १: लोकसहभाग व श्रमदानातून उभी राहिलेली लोकचळवळ

## १. पार्श्वभूमी

ग्रामविकास ही केवळ निधी आणि योजनांची अंमलबजावणी नसून ती लोकांच्या सहभागातून साकार होणारी सामूहिक प्रक्रिया आहे. पंचायत राज संस्था (PRI) आणि समुदाय आधारित संस्था (CBO) यांचा परिणामकारक समन्वय हा या प्रक्रियेचा कणा आहे. PRI स्थानिक स्वराज्य संस्थांद्वारे विकास नियोजन व अंमलबजावणीची जबाबदारी पार पाडली जाते, तर स्वयं-सहाय्यता गट आणि त्यांच्या संघटना गावकऱ्यांच्या गरजा समोर आणणे, लोकांना एकत्रित करणे आणि सामूहिक कृतीसाठी प्रेरित करणे यामध्ये महत्त्वाची भूमिका बजावतात.

PRI–CBO कृतीसंगम प्रकल्पाच्या माध्यमातून सहभागी नियोजन, व निर्णयप्रक्रिया आणि सामूहिक जबाबदारी या मूल्यांना बळ देण्यात आले. याच दृष्टीने मुख्यमंत्री समृद्ध पंचायत राज अभियानांतर्गत राबविण्यात आलेल्या श्रमदान उपक्रमाने ग्रामपातळीवर लोकसहभागाची नवचेतना निर्माण केली.



## २. उपक्रम

प्रकल्पाच्या १२ जिल्ह्यांमध्ये श्रमदान उपक्रम राबविण्यात आला. ग्रामपंचायत प्रतिनिधी, स्वयं-सहाय्यता गटांच्या महिला सदस्य, युवक मंडळे आणि ग्रामस्थ यांनी उत्स्फूर्तपणे सहभाग घेतला. गावाच्या विकासासाठी 'आपले गाव – आपली जबाबदारी' या भावनेतून सामूहिक श्रमदान करण्यात आले.

या उपक्रमांतर्गत बंधारे उभारणे, लहान पुलांची दुरुस्ती, नाल्यांची साफसफाई, पाणी साठवण संरचना मजबूत करणे, शाळा व अंगणवाडी परिसर स्वच्छता आणि सुशोभीकरण अशा विविध कामांची अंमलबजावणी झाली. अनेक ठिकाणी महिलांनीही पुढाकार घेत प्रत्यक्ष श्रमदानात सहभाग नोंदवला, ज्यामुळे विकास प्रक्रियेत समावेशकतेची नवी दिशा दिसून आली आहे.

हा उपक्रम केवळ भौतिक सुविधा उभारण्यापुरता मर्यादित राहिला नाही; तर ग्रामस्थांना एकत्र आणणारा, संवाद वाढविणारा आणि सामूहिक निर्णयप्रक्रियेला चालना देणारा ठरला आहे.

## ३. परिणाम

श्रमदानामुळे गावांतील पायाभूत सुविधांमध्ये ठोस सुधारणा झाली, परंतु त्याहून अधिक महत्त्वाचा बदल म्हणजे गावकऱ्यांच्या मनोवृत्तीत झालेला परिवर्तनात्मक बदल होय. विकासकामांविषयी स्वामित्वाची भावना निर्माण झाली, “ही आपलीच कामे आहेत” हा दृष्टिकोन दृढ झाला आणि सामूहिक जबाबदारीची जाणीव वाढीस लागली आहे.

PRI आणि CBO यांच्यातील समन्वय अधिक मजबूत झाला. नियोजन, अंमलबजावणी आणि देखरेख या सर्व टप्प्यांमध्ये परस्पर संवाद वाढला. महिलांचा आणि युवकांचा वाढता सहभाग हा ग्रामविकासातील सकारात्मक सामाजिक परिवर्तनाचा संकेत ठरला आहे श्रमदानातून उभ्या राहिलेल्या एकजूटीतून गावांमध्ये सामाजिक ऐक्य आणि परस्पर सहकार्याची पायाभरणी केली आहे.

हा उपक्रम ग्रामपातळीवरील विकास हा केवळ प्रशासनाचा विषय नसून लोकांच्या सहभागातून साकार होणारी लोकचळवळ आहे, याचे प्रभावी उदाहरण ठरलेला आहे.



## ४. पुढील दिशा

या उपक्रमातून निर्माण झालेली सामूहिकतेची आणि स्वामित्वाची भावना पुढेही टिकवून ठेवण्यासाठी नियमित ग्रामसभा, संयुक्त कृती आराखडे आणि नागरिक समित्यांचा सक्रिय सहभाग अधिक बळकट करणे आवश्यक आहे. PRI–CBO अभिसरण अधिक सुदृढ करून विकासकामांमध्ये लोकसहभागाची परंपरा रुजविणे आणि तरुण व महिलांच्या नेतृत्वाला प्रोत्साहन देणे ही या उपक्रमाची पुढील दिशा असेल.

लोकांच्या श्रमातून उभ्या राहिलेल्या या विकास चळवळीत सातत्य ठेवत ग्रामपातळीवरील सहभागी, उत्तरदायी आणि शाश्वत विकासाचा मार्ग अधिक व्यापक करण्याचा संकल्प हा या उपक्रमाचा खरा पुढचा टप्पा ठरेल.




Y58
2025, 16:48





छायाचित्र: मुख्यमंत्री समृद्ध पंचायत राज अभियानांतर्गत प्रकल्प अंमलबजावणी क्षेत्रातील ग्रामपंचायतींमध्ये PRI प्रतिनिधी व CBO सदस्यांनी संयुक्तपणे राबविलेला श्रमदान उपक्रम.

# यशोगाथा २ : ग्रामपंचायत समन्वय समित्या (GPCC) – कृतीसंगमातून सुदृढ ग्रामशासन

## १. पार्श्वभूमी

PRI–CBO अभिसरण प्रकल्पांतर्गत ग्रामपातळीवरील नियोजन अधिक सुसंगत, सहभागी आणि परिणामाभिमुख व्हावे यासाठी १२ जिल्ह्यांतील २४ तालुक्यांमध्ये एकूण १,७४० ग्रामपंचायत समन्वय समित्या (GPCC) स्थापन करण्यात आल्या आहेत. या समित्यांमध्ये ग्रामपंचायत सदस्य, स्वयं-सहाय्यता गट व त्यांच्या ग्रामसंघ (SHG–VO) प्रतिनिधी तसेच विविध शासकीय व स्थानिक स्तरावरील घटकांचा समावेश करण्यात आला. आशा कार्यकर्त्या, अंगणवाडी सेविका, तलाठी, ग्रामसेवक, पोलीस पाटील, सामाजिक कार्यकर्ते आणि इतर संबंधित प्रतिनिधींच्या सहभागामुळे या समित्या बहुआयामी व समन्वयाधारित व्यासपीठ म्हणून विकसित झाल्या.

## २. उपक्रम

GPCC चे प्रमुख उद्दिष्ट ग्रामपातळीवर संयुक्त व सहभागात्मक नियोजनाला चालना देणे, विविध विभागांमध्ये प्रभावी अभिसरण साधणे आणि लोकसहभाग अधिक दृढ करणे हे होते. या व्यासपीठाच्या माध्यमातून ग्रामपंचायत आणि समुदाय संस्था यांच्यात नियमित संवाद, माहितीची देवाणघेवाण आणि जबाबदाऱ्यांचे स्पष्ट वाटप सुनिश्चित करण्यात आलेले आहे.

मुख्यमंत्री समृद्ध पंचायत राज अभियानाच्या कालावधीत GPCC समित्यांनी विशेष भूमिका बजावली. अभियानांतर्गत उपक्रमांचे नियोजन, विशेष ग्रामसभा आयोजन, विभागनिहाय जबाबदाऱ्या निश्चित करणे आणि समन्वय साधणे ही कामे अधिक सुसूत्र पद्धतीने पार पडली. स्वयं-सहाय्यता गटांच्या सक्रिय सहभागामुळे ग्रामसभांमध्ये अपेक्षित कोरम पूर्ण होण्यास मदत झाली आणि निर्णयप्रक्रियेत व्यापक लोकसहभाग सुनिश्चित करता आला.



## ३. परिणाम


GPCC या व्यासपीठामुळे PRI, SHG आणि विविध शासकीय विभागांचे प्रतिनिधी एकत्र येऊन अभियानाशी संबंधित उपक्रमांचे संयुक्त नियोजन व प्रभावी अंमलबजावणी करू शकले. नियोजन प्रक्रियेत पारदर्शकता वाढली, माहितीचा प्रवाह अधिक सुलभ झाला आणि तात्काळ प्रतिसादाची यंत्रणा मजबूत झाली. जबाबदाऱ्यांचे योग्य वाटप झाल्यामुळे उपक्रम वेळेत पूर्ण होण्यास मदत झाली.

यामुळे ग्रामपातळीवरील प्रशासन अधिक समन्वयित, उत्तरदायी आणि लोकाभिमुख बनले. विविध घटकांच्या एकत्रित सहभागामुळे विकास प्रक्रियेत मालकीभाव व सामूहिक जबाबदारीची भावना दृढ झालेली आहे.

## ४. पुढील दिशा

GPCC या व्यासपीठाला अधिक सक्षम करण्यासाठी नियमित बैठकांचे संस्थीयकरण, कृती आराखड्यांचे प्रणालीबद्ध दस्तऐवजीकरण आणि नागरिक समित्यांशी सातत्यपूर्ण समन्वय आवश्यक आहे. PRI–CBO अभिसरण अधिक सुदृढ करत ग्रामपातळीवरील विकास प्रक्रियेत सर्व घटकांचा सक्रिय सहभाग सुनिश्चित करणे ही पुढील दिशा राहील.

अशा प्रकारे, PRI–CBO अभिसरण प्रकल्पांतर्गत स्थापन झालेल्या १,७४० GPCC समित्या मुख्यमंत्री समृद्ध पंचायत राज अभियानाच्या उद्दिष्टपूर्तीसाठी सक्षम, परिणामकारक आणि सुशासनाला चालना देणारे व्यासपीठ म्हणून सिद्ध झालेल्या आहेत.



ग्रामपंचायत कार्यालय भालावल

ता. सावंतवाडी, जि. सिंधुदुर्ग

जा. क्र. ३३ / २०२४/२५ — दि. १३/०६/२०२५

विशेष ग्रामसभा

समस्त ग्रामपंचायत अधिक्षेत्रातील सर्व ग्रामसभासदांना कळविण्यात येते कि, ग्रामपंचायत भालावल ची विशेष ग्रामसभा दि. १९/०६/२०२५ रोजी दुपारी १२:३० वाजता ग्रामपंचायत कार्यालय भालावल येथे आयोजित केलेली असून सदर विशेष ग्रामसभेस वेळीच उपस्थित राहावे हि विनंती.

ठिकाण : ग्रा.पं. भालावल

दिनांक : १९/०६/२०२५


वेळ : दुपारी १२:३० वाजता

सभेपुढील विषय :

१) आदिशक्ती अभियान अंतर्गत ग्रामस्तर समिती स्थापन करणेबाबत.

२) NRLM अंतर्गत ग्रामसंघ समन्वय समिती (VOCC) व ग्रामपंचायत समन्वय समिती (GPCC) स्थापन करणे.

तरी वरील प्रमाणे सभेस उपस्थित राहावे.



ग्रामपंचायत कार्यालय नेवरे

स्थापना :- १९४१ — ता.जि.रत्नागिरी — (०२३५७)२५७२३५

जा.क्र. १५९ /२०२५-२६ — दिनांक :- ११/०६/२०२५

प्रति,

सर्व ग्रामपंचायत सदस्य, मुख्याध्यापक न्यू इंग्लिश स्कुल नेवरे, सर्व जि.प.शिक्षक, अंगणवाडी सेविका, आरोग्य सेविका, आशा सेविका, तलाठी, कृषी सहाय्यक, सामाजिक वनीकरण, सर्व पोलीस पाटील, तंटामुक्ती अध्यक्ष, बचत गट CRP व अध्यक्ष, नेवरे वि.का.स.सेवा सोसायटी चेअरमन व अध्यक्ष, सर्व शासकीय – निमशासकीय कर्मचारी रा. नेवरे. ता.जि. रत्नागिरी.

विषय :- PRI-CBO प्रकल्पांतर्गत ग्रामपंचायत समन्वय समिती (GPCC) स्थापन करण्याबाबत.

संदर्भ :- जा.क्र.पंसर/ताअक/एमएसआरएलएम/३८९/२०२५/ ०२/०५/२०२५.

महाशय,

उपरोक्त विषयान्वये आपणांस कळविण्यात येते की, ग्रामपंचायत कार्यालय नेवरे येथे बुधवार दिनांक १८/०६/२०२५ रोजी दुपारी ठिक १२.०० वाजता PRI-CBO प्रकल्पांतर्गत ग्रामपंचायत समन्वय समिती (GPCC) स्थापन करण्यासाठी आपण सर्वांनी उपस्थित राहावे.

ही विनंती.


कळावे.

आपला विश्वासु,

सरपंच

ग्रामपंचायत नेवरे

ता. जि. रत्नागिरी



ग्रामपंचायत कार्यालय जोडमोहा

ता.कळंब जि.यवतमाळ

विषय : PRI-CBO प्रकल्पअंतर्गत ग्रामपंचायत स्तरावर ग्राम पंचायत समन्वय समिती (GPCC) ची स्थापना करणे बाबत

उपरोक्त संदर्भीय विषयानुसार PRI-CBO Convergence प्रकल्प अंतर्गत ...

करिता आपणास या पत्राद्वारे कळविण्यात येत आहे.

सचिव

ग्राम पंचायत,जोडमोहा

प्रतिलिपी :-

1) मा.गटविकास अधिकारी पंचायत समिती कळंब

छायाचित्रे: GPCC स्थापनेबाबत ग्रामपंचायतींनी जारी केलेली अधिकृत पत्रे.














छायाचित्र: प्रकल्प अंमलबजावणी क्षेत्रातील विविध ग्रामपंचायतींमध्ये GPCC ची स्थापना व आयोजित बैठका.

# यशोगाथा ३: PRI–CBO अभिसरण प्रकल्पातून महिलांचा वाढता सहभाग- विशेष ग्रामसभेतील सामूहिक निर्णय प्रक्रियेचा अनुभ

### (गोंदे दुमला ग्रामपंचायत, ता. इगतपुरी, जि. नाशिक)

## १.पार्श्वभूमी संदर्भ

गोंदे दुमला ग्रामपंचायतीमध्ये PRI–CBO अभिसरण प्रकल्पाची अंमलबजावणी करण्यात आली राज्यातील १२ जिल्हे, २४ तालुके व १,९२२ ग्रामपंचायतींमध्ये हा उपक्रम सुरु आहे. या प्रकल्पाचा मुख्य उद्देश ग्रामपातळीवरील संस्था सक्षमीकरण, सहभागात्मक निर्णयप्रक्रिया आणि पंचायत राज संस्था (PRI) व स्वयं-सहाय्यता गट (SHG-VO) यांच्यात प्रभावी अभिसरण साधणे आहे.

प्रकल्पाच्या अंमलबजावणीपूर्वी, महिलांची ग्रामसभेत उपस्थिती असली तरी निर्णयप्रक्रियेत त्यांचा सक्रिय सहभाग मर्यादित होता. शासकीय योजना, हक्क व ग्रामसभेतील अधिकार यांविषयी जागरूकतेचा अभाव जाणवत होता. या पार्श्वभूमीवर प्रकल्पाने महिला सक्षमीकरण, ७३व्या घटनादुरुस्तीबाबत माहिती प्रसार, महिला संघटनांना बळकटी देणे आणि ग्रामसभांमध्ये सहभाग वाढवणे यावर विशेष लक्ष केंद्रीत केले होते.

## २. उपक्रम

प्रकल्पांतर्गत महिला स्वयं-सहाय्यता गटांना, ग्रामसंघ आणि ग्रामपंचायत सदस्यांना नियमित संवाद व पूर्वतयारी बैठका घेतल्या गेल्या. महिलांना ग्रामसभा प्रक्रियेत सहभागी होण्यासाठी, ठराव मांडण्यासाठी आणि योजनांविषयी माहिती देण्यासाठी मार्गदर्शन करण्यात आलेले आहे.

मुख्यमंत्री समृद्ध पंचायत राज अभियानांतर्गत १७ सप्टेंबर २०२५ रोजी गोंदे दुमला ग्रामपंचायतीत विशेष ग्रामसभा आयोजित करण्यात आली होती, जिथे दहा स्वयं-सहाय्यता गट (SHG) एकत्र येऊन संघटित स्वरूपात आपल्या मागण्यांचे आत्मविश्वासपूर्ण सादरीकरण केले होते.
या ग्रामसभेत पुढील मुद्द्यांवर ठराव मांडले गेले:

- आठ अंतर्गत रस्त्यांचे बांधकाम
- अंगणवाडीतील मुलांसाठी मोफत गणवेश वितरण
- रेशन कार्ड आणि आयुष्मान भारत शिबिरांचे आयोजन
- महिलांसाठी आरोग्य तपासणी मोहीम
- ग्रामस्वच्छता आणि घनकचरा व्यवस्थापन आराखडा
- शाळा व अंगणवाडीचे डिजिटायझेशन
- 'उमेद' अंतर्गत स्थापन झालेल्या दोन महिला ग्रामसंघांसाठी कार्यालयीन जागेबाबत मागणी

या उपक्रमामुळे महिलांनी केवळ सहभाग नोंदवला नाही, तर संघटितपणे आणि आत्मविश्वासपूर्ण पद्धतीने आपल्या मागण्या मांडल्या, ज्यामुळे ग्रामसभा प्रक्रियेत त्यांच्या भूमिका अधिक दृढ आणि प्रभावी झाल्या आहेत.

### ३. परिणाम

या विशेष ग्रामसभेत महिलांनी संघटितपणे मांडलेल्या मागण्यांमुळे अनेक महत्त्वाचे निर्णय ग्रामसभेत मंजूर झाले.

मंजूर झालेले निर्णय / उपलब्धी:

- आठ अंतर्गत रस्त्यांचे बांधकाम मंजूर करण्यात आले.
- अंगणवाडीतील मुलांसाठी मोफत गणवेश वितरणास मंजूरी देण्यात आली.
- रेशन कार्ड व आयुष्मान भारत शिबिरे आयोजित करण्यास मान्यता देण्यात आली.
- महिलांसाठी आरोग्य तपासणी मोहीम राबविणेसाठी मान्यता देण्यात आली.
- ग्रामस्वच्छता व घनकचरा व्यवस्थापन आराखडा तयार करून मंजूरी देण्यात आली.
- शाळा व अंगणवाडी डिजिटायझेशनसाठी आवश्यक निर्णय घेवून मान्यता देण्यात आली.
- ‘उमेद’ अंतर्गत स्थापन झालेल्या दोन महिला ग्रामसंघांसाठी कार्यालयीन जागेबाबत मागणी मान्य करून जागा हस्तांतरीत करण्यात आली.

या प्रक्रियेमुळे ग्रामसभेत महिलांचा आत्मविश्वास आणि नेतृत्वक्षमता स्पष्टपणे दिसून आली. त्यांनी ठराव मांडणे, चर्चा करणे आणि निर्णय प्रक्रियेत सक्रिय सहभाग घेणे शिकता आले. ग्रामपंचायत व महिला संघटनांमध्ये संवाद व समन्वय अधिक दृढ झाला, आणि दीर्घकालीन प्रलंबित विषयांवर सकारात्मक निर्णय प्रक्रिया पुढे सरकली. परिणामी, ग्रामसभा हा अधिक सहभागी, पारदर्शक आणि नियोजनाधिष्ठित निर्णयमंच म्हणून उभा राहिला, ज्यामुळे गावपातळीवरील सहभागात्मक विकासाला चालना मिळालेली आहे.




छायाचित्र: १७ सप्टेंबर रोजी गोंदे दुमला ग्रामपंचायतीतील विशेष ग्रामसभा, इगतपुरी तालुका, नाशिक

## ४. पुढील दिशा

महिला नेतृत्व आणि निर्णयक्षमतेस सातत्यपूर्ण बळकटीकरणासाठी क्षमता-वृद्धी उपक्रम राबवणे महत्त्वाचे आहे. ग्रामसभांपूर्वी विषयाधारित पूर्वतयारी बैठका नियमित केल्यास महिला सदस्य ठराव मांडणी आणि प्राधान्यक्रम निश्चिती अधिक आत्मविश्वासाने करू शकतील. महिला संघटनांना ग्रामविकास आराखड्यात अधिक संरचित आणि औपचारिक सहभाग देऊन निर्णय प्रक्रियेत समावेश वाढवता येईल. तसेच, गोंदे दुमला ग्रामपंचायतीमधील या अनुभवाचे दस्तऐवजीकरण करून इतर ग्रामपंचायतींमध्ये प्रसार केल्यास सहभागात्मक, समन्वयाधिष्ठित आणि सुशासनावर आधारित ग्रामविकास प्रक्रियेला अधिक गती देता येईल.






छायाचित्र: १७ सप्टेंबर रोजी गोंदे दुमला ग्रामपंचायतीतील विशेष ग्रामसभा, इगतपुरी तालुका, नाशिक

# ययशोगाथा ४ – नागरिक समिती बळकटीकरण: “गाव पातळीवरील संस्था सक्षमीकरण” या उद्दिष्टाकडे एक प्रभावी पाऊल

## १. संदर्भ

PRI–CBO अभिसरण प्रकल्पाची अंमलबजावणी राज्यातील १२ जिल्हे, २४ तालुके आणि १,९२२ ग्रामपंचायतींमध्ये सुरू आहे. प्रकल्पाचा मुख्य उद्देश ग्रामपातळीवरील संस्थांची कार्यक्षमता वृद्धिंगत करणे, ग्रामसभेला अधिक परिणामकारक बनविणे आणि समुदाय आधारित संस्था (CBOS) व पंचायत राज संस्था (PRIS) यांच्यात समन्वय व अभिसरण अधिक दृढ करणे हा आहे. “मुख्यमंत्री समृद्ध पंचायत राज अभियान” अंतर्गत दुसरे उद्दिष्ट असलेल्या “गाव पातळीवरील संस्था सक्षमीकरण” या ध्येयपूर्तीसाठी नागरिक समित्यांचे बळकटीकरण हा महत्त्वपूर्ण घटक ठरला आहे.

## २. उपक्रम

PRI–CBO अभिसरण प्रकल्पांतर्गत ग्रामपातळीवरील नागरिक समित्यांचे कार्य अधिक सुरळीत, सहभागी आणि परिणामाभिमुख व्हावे यासाठी जून २०२५ पासून स्थानिक संसाधन व्यक्ती (LRP) यांच्या मार्गदर्शनाखाली बळकटीकरण उपक्रम राबविण्यात आले होते.

या प्रक्रियेत ग्रामपंचायत सदस्य, विभागाचे प्रतिनिधी, स्वयं-सहाय्यता गट (SHG) आणि अन्य समुदाय आधारित संस्था (CBO) चे सदस्य यांचा समावेश करून समित्यांमध्ये सक्रिय सहभाग सुनिश्चित केला गेला. बैठका आणि चर्चांमधून समित्यांनी गावातील पायाभूत सुविधा, शाळा, अंगणवाडी, आरोग्य, स्वच्छता आणि पोषण यांसारख्या विषयांवर चर्चा करून सुधारणा व नवकल्पनांवर निर्णय घेतले गेले.
यामध्ये पुढील उपक्रम राबविण्यात आले:

शाळा व्यवस्थापन समिती (SMC), ग्राम आरोग्य, स्वच्छता व पोषण समिती (VHSNC) आणि अंगणवाडी स्तर देखरेख व सहाय्य समिती (ALMSC) यांच्या बैठका नियमित आयोजित केल्या.

| समिती प्रकार | बैठका आयोजित झालेल्या एकूण ग्रामपंचायती |
|---|---|
| ALMSC | १,९०२ |
| SMC | १,८०५ |
| VHSNC | १,६११ |

- बैठकींमध्ये ग्रामपंचायत सदस्य, विभागाचे प्रतिनिधी (जसे की आरोग्य अधिकारी, शिक्षक, पोलीस पाटील), स्वयं-सहाय्यता गट (SHG/VO) आणि अन्य समुदाय आधारित संस्था (CBO) चे सदस्य उपस्थित होते.

- समित्यांमध्ये गावातील पायाभूत सुविधा, शाळा, अंगणवाडी, आरोग्य, स्वच्छता, पोषण आणि इतर विकास विषयांवर चर्चा करून सुधारणा प्रस्ताव आणि निर्णय घेण्यात आले.
- सदस्यांना अर्थपूर्ण सहभाग सुनिश्चित करण्यासाठी मार्गदर्शन करण्यात आले, ठराव मांडणी प्रक्रियेवर प्रशिक्षण देण्यात आले आणि सातत्यपूर्ण संवादासाठी व्हॉट्सअॅप गट स्थापन केले होते.

अशाप्रकारे ज्या समित्यांना अजून बळकटीकरणाची आवश्यकता आहे, त्यांच्यासाठी सातत्यपूर्ण जनजागृती व मार्गदर्शन सुरू ठेवले गेले.

## ३. परिणाम

नागरिक समित्यांच्या बळकटीकरणामुळे ग्रामपातळीवरील संस्थांच्या कार्यप्रणालीत लक्षणीय बदल दिसून आला आहे. समित्यांचे सदस्य आता केवळ उपस्थित राहत नाहीत, तर चर्चेत सक्रिय योगदान देत आहेत आणि निर्णय प्रक्रियेत अर्थपूर्ण भूमिका बजावत आहेत. LRPS यांच्या मार्गदर्शनाखाली घेतलेल्या उपक्रमांमुळे समित्यांचे काम अधिक सुसंगत, सहभागी व परिणामाभिमुख झाले आहे.
नागरिक समित्यांनी मिळवलेले ठळक परिणाम पुढीलप्रमाणे आहेत:

- शाळांमध्ये पायाभूत सुविधांमध्ये सुधारणा व सुरक्षित शैक्षणिक वातावरण निर्मिती झाली.
- मध्यान्ह भोजनाच्या गुणवत्तेवर प्रभावी देखरेख व सुधारणा झाली.
- वाचनालये आणि डिजिटल साधनांची उपलब्धता वाढली.
- आरोग्य, स्वच्छता आणि पोषण विषयक नियोजन अधिक सुसंगत झाले.
- आरोग्य शिबिरे, किशोरी गट बैठकांचे आयोजन व आरोग्य विभागाशी समन्वय अधिक प्रभावी झाला.
- अंगणवाडी स्तर देखरेख व सहाय्य समित्यांमार्फत पूरक पोषण, स्वच्छता, पायाभूत सुविधा सुधारणा आणि पोषण अभियानाचे उपक्रम नियमित व परिणामकारक झालेत.

या प्रक्रियेमुळे समित्या अधिक सुसंघटित, उत्तरदायी आणि परिणामाभिमुख बनल्या आहेत. ग्रामपातळीवरील निर्णय प्रक्रियेत त्यांचा सहभाग दृढ झाला असून स्थानिक संस्थांची क्षमता वृद्धिंगत झाली आहे. यामुळे सुशासन, पारदर्शकता आणि सेवा वितरणात सातत्याने सकारात्मक प्रगती दिसून येत आहे.

## ४. पुढील दिशा

नागरिक समित्यांच्या बळकटीकरणातून मिळालेल्या अनुभवाच्या आधारे पुढील पावले अधिक परिणामकारक ठरू शकतात. समित्यांच्या बैठका व कृती आराखडे नियमित करण्याचे काम सतत सुरू ठेवावे लागेल जेणेकरून निर्णय प्रक्रियेत सदस्यांचा अर्थपूर्ण सहभाग सुनिश्चित होईल. सदस्यांच्या नेतृत्वक्षमता आणि सहभाग वाढविण्यासाठी सातत्यपूर्ण मार्गदर्शन, प्रशिक्षण व क्षमता-वृद्धी उपक्रम राबविणे आवश्यक आहे.

याशिवाय, या प्रक्रियेचे दस्तऐवजीकरण करून इतर ग्रामपंचायतींमध्ये प्रसारित केल्यास नागरिक समित्यांच्या बळकटीकरणातून मिळालेली अनुभवसंपदा ग्रामीण स्तरावर सहभागी शासन आणि संस्था सक्षमीकरणासाठी मार्गदर्शक ठरेल.









छायाचित्र : प्रकल्प अंमलबजावणी क्षेत्रातील विविध शाळांमध्ये आयोजित शाळा व्यवस्थापन समिती (SMC) बैठका






छायाचित्र : प्रकल्प अंमलबजावणी क्षेत्रातील ग्राम आरोग्य, स्वच्छता व पोषण समिती (VHSNC) बैठका





छायाचित्र : प्रकल्प अंमलबजावणी क्षेत्रातील अंगणवाडी स्तर देखरेख व सहाय्य समिती (ALMSC) बैठका









छायाचित्र : प्रकल्प अंमलबजावणी क्षेत्रातील ग्राम आरोग्य, स्वच्छता व पोषण समिती (VHSNC) बैठका






छायाचित्र : प्रकल्प अंमलबजावणी क्षेत्रातील विविध अंगणवाडी केंद्रांमध्ये पोषण अभियानांतर्गत साजरा करण्यात आलेला पोषण पंधरवडा – अंगणवाडी स्तर देखरेख व सहाय्य समिती (ALMSC) सदस्यांचा सक्रिय सहभाग








छायाचित्र : प्रकल्प अंमलबजावणी क्षेत्रातील विविध अंगणवाडी केंद्रांमध्ये पोषण अभियानांतर्गत साजरा करण्यात आलेला पोषण पंधरवडा – अंगणवाडी स्तर देखरेख व सहाय्य समिती (ALMSC) सदस्यांचा सक्रिय सहभाग









छायाचित्र : प्रकल्प अंमलबजावणी क्षेत्रातील ग्रामपंचायतींमधील अंगणवाडी केंद्रांचे सुशोभीकरण उपक्रम

# यशोगाथा ५ : ग्राम सतत समृद्धी आराखडा (VPRP) – स्थानिक सहभागातून समावेशी विकास

## (कोसोम्बी ग्रामपंचायत, मुल तालुका, चंद्रपूर जिल्हा, महाराष्ट्र)

### १. संदर्भ

PRI–CBO अभिसरण प्रकल्पाअंतर्गत उमेद–MSRLM ने कुटुंबश्री NRO सोबत सहकार्य करून ग्रामपंचायत, समुदाय आधारित संस्था (CBOS) आणि शासकीय विभाग यांच्यात समन्वय वाढविला. हा उपक्रम गाव पातळीवरील सेवा वितरण अधिक परिणामकारक, समावेशी आणि सहभागी बनविण्यासाठी राबविला गेला. ग्राम सतत समृद्धी आराखडा (VPRP) च्या माध्यमातून गावकऱ्यांच्या गरजा, विकास प्राधान्यक्रम आणि समुदायाचा सहभाग सुसंगत पद्धतीने नोंदविला गेला. कोसोम्बी ग्रामपंचायतीतील हा उपक्रम जिल्ह्यातील पहिला आणि प्रभावी प्रत्यक्ष उपक्रम ठरलेला आहे.

### २. उपक्रम

VPRP प्रक्रियेअंतर्गत महाकाली ग्रामसंघ ने समुदाय मार्गदर्शन बैठकांचे आयोजन करून ग्रामस्थांच्या विविध मागण्या संकलित केल्या – ज्यात पेन्शन, रेशन कार्ड, आरोग्य सेवा, रोजगार आणि पायाभूत सुविधांबाबत मागणी होती. या मागण्यांचे संघटितपणे ग्रामसभेत सादरीकरण करण्यात आले.

त्यामुळे अभिसरण शिबीर आयोजित करण्याची योजना राबविली गेली, जिथे ग्रामपंचायत, ग्रामसंघ, स्वयंसेवक आणि शासकीय विभागांचे प्रतिनिधी सामील होऊन सर्व मागण्यांचे संयुक्त निराकरण करण्यासाठी योजना आखण्यात आल्या. ग्रामपंचायतीने महसूल विभाग व पंचायत समितीशी संपर्क साधून संबंधित विभागांना सुचना देण्यात आल्या.

शिबीराचे आयोजन सामायिक स्वरूपात पार पडले: ग्रामपंचायतीने ठिकाण व आवश्यक व्यवस्था केले, तर ग्रामसंघ व स्वयंसेवकांनी घरोघर भेटी, युवक स्वयंसेवक, आणि डिजिटल निमंत्रणे यांद्वारे लोकांना सहभागी केले. २१ मार्च २०२५ रोजी हे शिबीर यशस्वीरित्या पार पडले, जिथे आरोग्य, कृषी, पशुपालन, आदिवासी कल्याण यांसारख्या विभागीय मदत केंद्रांद्वारे सेवा थेट ग्रामपंचायत परिसरात उपलब्ध झाल्या.



## ३. परिणाम

हा उपक्रम गावकऱ्यांसाठी अत्यंत लाभदायक ठरला. १८० हून अधिक ग्रामस्थांनी आरोग्य तपासणी करून घेतली; काही अॅनिमिया व प्रारंभिक कॅन्सर रुग्ण ओळखले गेले व उपचारासाठी पाठवले गेले, ज्यामुळे जीवन वाचण्याची शक्यता निर्माण झाली. शेतकऱ्यांना शेतीशी संबंधित मार्गदर्शन व सहाय्य मिळाले, आदिवासी कुटुंबांनी आवश्यक प्रमाणपत्रांसाठी अर्ज केला, तर अनेकांनी पेन्शन व आरोग्य कार्ड सेवांसाठी अर्ज केला.

स्वयं-सहाय्यता गटातील महिलांनी अधिकाऱ्यांशी संवाद साधून आपल्या मागणी सादर करण्यास आत्मविश्वास वाढविला. या प्रक्रियेमुळे महिलांच्या नेतृत्वक्षमता वाढल्या, ग्रामपंचायत व विभागीय प्रतिनिधींमध्ये समन्वय अधिक दृढ झाला आणि गावकऱ्यांमध्ये स्थानिक निर्णय प्रक्रियेत सहभागाची भावना अधिक प्रगल्भ झाली.

कोसोम्बी शिबीराच्या यशानंतर हा उपक्रम १२ जिल्ह्यांमध्ये विस्तृत प्रमाणात राबविण्यात आला. डिसेंबर २०२४ ते नोव्हेंबर २०२५ दरम्यान एकूण १४८० अभिसरण शिबीर आयोजित केले गेले, ज्यामध्ये ५९,४२४ लोकांना त्यांच्या हक्क आणि रोजगाराशी संबंधित सेवांचा थेट लाभ मिळाला. या उपक्रमामुळे ग्रामीण स्तरावर विकासकामांची कार्यक्षमता वाढली, ग्रामस्थांचा सहभाग अधिक सुसंगत झाला आणि स्थानिक संस्थांमधील समन्वय अधिक प्रभावी व परिणामाभिमुख ठरला.




## ४. पुढील दिशा

कोसोम्बी ग्रामपंचायत च्या अनुभवाने दाखवले की, VPRP आणि अभिसरण शिबीर हे गावपातळीवरील सेवा वितरणासाठी प्रभावी साधन आहे. भविष्यात याचा इतर तालुका व जिल्ह्यांमध्ये विस्तार करणे, स्वयं सहायता समुहातील महिला, ग्रामपंचायत सदस्य व ग्रामसंघ प्रतिनिधींना सतत प्रशिक्षण देणे आणि समुदाय-आधारित मागणी संकलन व सहकारी निर्णय प्रक्रियेला अधिक मजबुती देणे गरजेचे आहे. यामुळे गावपातळीवरील समावेशी, सहभागी आणि परिणामकारक विकास प्रक्रियेला चालना मिळेल.










छायाचित्र : प्रकल्प अंमलबजावणी क्षेत्रातील ग्रामपंचायतींमधील अभिसरण शिबीर उपक्रम

# यशोगाथा ६: जेव्हा लोक योजना करतात, तेव्हा प्रगती होते

## (पांगरदरवाडी ग्रामपंचायत, तुळजापूर तालुका, धाराशिव जिल्हा, महाराष्ट्र)

### १. संदर्भ

PRI–CBO अभिसरण प्रकल्पांतर्गत, उमेद–महाराष्ट्र SRLM आणि कुडुम्बश्री NRO यांनी ग्रामपंचायती आणि समुदाय आधारित संस्था (CBOS) यांच्यात सहभागात्मक नियोजन आणि मजबूत समन्वय प्रोत्साहित केला आहे. ग्राम सतत समृद्धी आराखडा (VPRP) प्रक्रियेद्वारे गावकऱ्यांना—विशेषतः महिलांना—ग्रामविकासासाठी त्यांच्या गरजा आणि प्राधान्ये व्यवस्थितपणे मांडण्याची संधी मिळते. या प्रक्रियेमुळे ग्रामसभा फक्त औपचारिक रचना न राहता वास्तविक निर्णयमंच बनते, जिथे नागरिकांचा सहभाग अर्थपूर्ण होतो.

### २. उपक्रम

पांगरदरवाडी ग्रामपंचायतीत VPRP प्रक्रियेद्वारे सहभागात्मक गावनकाशा तयार केला गेला. यामध्ये ग्रामपंचायत सदस्य, महिला, युवक आणि CBO प्रतिनिधी सहभागी झाले आणि सेवा व पायाभूत सुविधांमध्ये असलेल्या अंतरांचा अभ्यास केला. चर्चेच्या माध्यमातून नऊ प्राधान्य मागण्या ठरवल्या गेल्या.

या मागण्यांना ग्रामसभेत अधिक प्रभावीरीत्या मांडण्यासाठी ग्रामसंघाने सक्रिय जनसंपर्क मोहिम राबविली—घरोघरी भेट, पोस्टर, रॅली तसेच डिजिटल माध्यमांचा उपयोग करून ग्रामसभेत जास्तीत जास्त नागरिकांची उपस्थिती सुनिश्चित केली. ग्रामसभेत VPRP नकाशा आणि प्राधान्य मागण्यांचा ग्रामसंघाद्वारे सादरीकरण करण्यात आले आणि ग्रामपंचायतीकडून औपचारिक मान्यता प्राप्त झाली.

स्थानिक संसाधन व्यक्ती (LRP) आणि CBO सदस्यांनी ग्रामपंचायतीसह सातत्यपूर्ण संवाद राखला, ज्यामुळे समुदायाच्या मागण्यांचा समावेश GPDP मध्ये सुनिश्चित झाला आणि अंमलबजावणीसाठी मार्गदर्शन मिळाले.





## ३. परिणाम

पांगरदरवाडी ग्रामपंचायत मध्ये नऊ प्राधान्य मागण्यांपैकी सहा मागण्या GPDP मध्ये समाविष्ट झाल्या, 10 लाखांचा निधी मंजूर झाला, आणि पुढील कामे सुरू झाली:

- पाणी टाकी प्रकल्प (३०% राखीव स्वच्छता निधी अंतर्गत) मंजूर करण्यात आला.
- गावातील पाणी समस्येचे निराकरण अपेक्षित उपाययोजना करणे.
- मुलींना शाळेत पोहोचताना सुरक्षितता आणि वेळेची समस्या कमी व्हावी म्हणून थेट बस सेवा मंजूर,
- स्थानिक रस्त्यांचे बांधकाम सुरू झाले.
- शाळा व अंगणवाडी डिजिटायझेशनसाठी आवश्यक निधी मंजूर केला गेला.
- अन्य सामाजिक सेवांसाठी आरोग्य तपासणी, रेशन कार्ड आणि आयुष्मान भारत शिबिरे आयोजित करणे.

या प्रक्रियेमुळे SHG महिला आणि युवक, स्थानिक प्रशासनात आत्मविश्वासाने सहभागी होऊ लागले, आणि समुदायाचा सहभाग प्रतीकात्मक नसून परिणामकारक झाला.



छायाचित्र: ग्रामस्थांच्या सक्रीय सहभागातून राबविण्यात आलेला गाव नकाशांकन उपक्रम.

## ४. पुढील दिशा

पांगरदरवाडी चा अनुभव दाखवतो की जेव्हा लोक योजना करतात, तेव्हा संस्था प्रतिसाद देतात. सहभागी शासन ही फक्त प्रक्रिया नाही; ती स्थायी, दृष्यमान बदल घडवणारी वाट आहे. हे उदाहरण इतर ग्रामपंचायतींसाठी मार्गदर्शक ठरू शकते, जिथे VPRP प्रक्रिया स्वीकारून समुदायाच्या मागण्या GPDP मध्ये यशस्वीरीत्या समाविष्ट करण्यात आल्या आहेत. अशा प्रयत्नांमुळे ग्रामीण प्रशासन अधिक उत्तरदायी, समावेशक आणि जबाबदार बनण्याची संधी निर्माण होते, आणि गावपातळीवरील विकास अधिक सुसंगत, पारदर्शक आणि परिणामकारक होतो.

दि० 5/12/2024

मा. ग्रामपंचायत पांगरदरवाडी
सरपंच, उपसरपंच व ग्रामसेवक

आज दिनांक 5 डिसेंबर 2024 रोजी पांगरदरवाडी गावस्तरावर गाव नकाशा काढून ग्राम समृद्धी योजना (VPRP) अंतर्गत सार्वजनिक, मालमत्ता, सेवा व संसाधन विकास आराखडा मार्फत उपस्थित नागरिकांच्या मागण्या व समस्या मांडण्यात आल्या तरी या मागण्या GPDP आराखड्यात समाविष्ट करण्यात ही नम्र विनंती.

मागण्यांची यादी पुढील प्रमाणे :-

1. गावामध्ये मोबाइल टॉवर अंत्यंत आवश्यक
2. वाढत्या लोकसंख्येचा विचार करता गावामध्ये अजून एक पाण्याची मोठी टाकी असणे आवश्यक
3. अंगणवाडी क्रमांक 803 व 804 मध्ये शौचालय व पाण्याची व्यवस्था आवश्यक
4. वार्ड क्र 3 मध्ये पाण्याची पाईप लाइन आवश्यक
5. मुस्लीम समाजाच्या दफनभूमी कडे जाण्याचा रस्ता आवश्यक
6. गल्लोगल्ली कचरा व्यवस्थापनासाठी कचराकुंडी आवश्यक
7. पाण्याच्या टाकी कडे जाण्याचा रस्ता
8. मुलांना खेळण्यासाठी ओपन पार्क
9. शाळेच्या मुला-मुलींसाठी ये-जा करण्यासाठी बसची व्यवस्था करण्यासाठी महाराष्ट्र परिवहन महामंडळ येथे पत्र देण्यात यावी.

सरपंच
ग्राम पंचायत, पांगरदरवाडी
ता. तुळजापूर

अध्यक्ष सचिव

Received



ग्रामपंचायत कार्यालय, पांगरदरवाडी ता. तुळजापूर जि. धाराशिव

आमचा गाव आमचा विकास (GPDP) अंतर्गत

लोकसंख्या- 1726

SC- 85

| | |
|---|---|
| TIED | 715,180.00 |
| UNTIED | 476,780.00 |
| GRANT TOTAL | 1,191,960.00 |

| ग्रामसभा दिनांक : | | | ठराव क्रमांक :- | 02 |
|---|---|---|---|---|
| ग्रामपंचायत स्तरावरील वार्षिक विकास आराखडा (वित्त आयोग बंधित व अबंधित निधीचे 1.2 पट निधी पकडून) सन - | | | | 2025-2026 |
| अ.क्र. | तपशील | | कामाचे नाव | एकूण निधी |
| 1 | बंधित निधी (60%) | A | 30% - स्वच्छता व हागणदारीमुक्त गावाचा दर्जा राखणे | |
| | | 1 | सांडपाणी घनकचरा व्यवस्थापन अंतर्गत सर्व कामे, घंटागाडी,डस्टबिन, सार्वजनिक ठिकाणी मुतारी-शौचालय व्यवस्था करणे, फवारणी - धुराळणी | 357,590.00 |
| | | B | 30% - पिण्याचे पाणीपुरवठा, पावसाचे पाणी संकलन आणि पुनर्वापर | |
| | | 1 | पाणी पुरवठा टाकी दुरुस्ती,विहीर-बोअर पाणी पुरवठा दुरुस्ती विषयक सर्व कामे,पाईपलाईन, मोटार बसविणे,TLC खरेदी करणे | 357,590.00 |
| | | | एकूण रक्कम : - | 715,180.00 |
| 2 | अबंधित निधी (40%) | A | अंगणवाडी ISO करणे व सर्व अनुषंगिक कामे | 47,678.00 |
| | | B | शिक्षण- जि.प.शाळा ISO करणे सर्व कामे,LCD खरेदी, प्रयोगशाळा साशित्य खरेदी करणे | 47,678.00 |
| | | C | TLC खरेदी, फवारणी-धुराळणी, बंदिस्त गटार | 47,678.00 |
| | | D | अपंग निधी | 23,839.00 |
| | | E | मागासवर्गीय वस्तीमध्ये रस्ता दुरुस्ती पाणी पुरवठा,लाईटची सोय करणे | 23,839.00 |
| | | F | 10% -आपले सरकार सेवा केंद्र - ASSK | 47,678.00 |
| | | G | गार्डन तयार करणे, सिमेंट रस्ता दुरुस्ती,सभागृह दुरुस्ती,CCTV बसविणे | 238,390.00 |
| | | | एकूण रक्कम : - | 476,780.00 |

छायाचित्र : प्रकल्प अंमलबजावणी क्षेत्रातील ग्रामपंचायतींमार्फत सार्वजनिक मागण्यांची प्रत्यक्ष अंमलबजावणी

# यशोगाथा ७: बालसभांच्या माध्यमातून बालसुलभ गावाकडे वाटचाल

## (सावंतवाडी तालुका, सिंधुदुर्ग जिल्हा, महाराष्ट्र)

### १. संदर्भ

MSRLM आणि कुडुम्बश्री NRO यांच्या PRI–CBO अभिसरण प्रकल्पाअंतर्गत डिसेंबर २०२३ पासून सावंतवाडी तालुक्यात बालकांच्या अनियंत्रित मोबाईल वापरामुळे शिक्षण, आरोग्य आणि सामाजिक वर्तनावर होणाऱ्या परिणामांचा विचार करता बालकल्याण विषयक प्राधान्य ओळखण्यात आले. VPRP च्या सामाजिक विकास घटकांतर्गत ग्रामसंघांनी ही बाब प्राधान्य म्हणून मांडली, ज्यावर आधारित केरळमधील बालसभा मॉडेलचा अवलंब करून गावस्तरावर संरचित उपाय राबविण्यात आले. बालसभा उपक्रमाचे मुख्य उद्दिष्ट मुलांचे नेतृत्व व निर्णयक्षमता वाढविणे आणि ग्रामपातळीवरील विकास प्रक्रियेत मुलांचा आवाज प्रभावीपणे ऐकू येणे हे होते.



### २. उपक्रम

सावंतवाडी तालुक्यातील ६३ ग्रामपंचायतींमध्ये बालसभा स्थापन करण्यात आल्या, ज्या ६ ते १८ वर्षांच्या मुलांना गावाच्या जीवनात सक्रिय सहभाग घेण्याचे व्यासपीठ देतात. स्वयं-सहाय्यता गट (SHG) आणि ग्रामपंचायत तसेच आरोग्य, ICDS, शिक्षण, पोलीस व कृषी यांसारख्या विभागांच्या पाठबळासह मुलांना बैठकांचे आयोजन करणे, अजेंडा तयार करणे, नोंदी ठेवणे आणि स्थानिक विकासाच्या विषयांवर चर्चा करण्याचे प्रशिक्षण दिले गेले. बालसभांमध्ये मुलांनी सुरक्षित खेळाचे मैदान कार्यरत वाचनालये, आरोग्य व स्वच्छतेबाबत माहिती, खुल्या व्यायामशाळा आणि इतर बालसुलभ सुविधांसाठी आपले मुद्दे मांडले. १७ ग्रामपंचायतींमध्ये मुलांनी सरपंचांना औपचारिकरित्या उपस्थित राहण्यासाठी आमंत्रित केले आणि स्थानिक नेत्यांनी मुलांच्या स्पष्टता, धैर्य व प्रतिबद्धतेला दखल देत त्यांच्याशी संवाद साधला. यामुळे मुलांचा आत्मविश्वास आणि सहभाग स्पष्ट दिसून आला.

## ३. परिणाम

बालसभांच्या माध्यमातून अनेक ग्रामपंचायतींमध्ये मुलांच्या गरजा GPDP मध्ये समाविष्ट केल्या गेल्या. त्यातील काही मागण्या खालीलप्रमाणे समाविष्ट होवून आधिकृतपणे मान्यता देण्यात आली.

- खेळाची मैदाने, बागा, खुल्या व्यायामशाळा आणि वाचनालयासाठी निधी मंजूर केला गेला.
- ३०% आरोग्य व स्वच्छता निधी अंतर्गत शाळा आणि अंगणवाडी केंद्रांमध्ये स्वच्छता व पाण्याच्या सुविधा मंजूर करण्यात आल्यात.
- मुलांच्या सोयी आणि सुरक्षिततेसाठी थेट बस सेवा मंजूरी दिली गेली.

सावंतवाडीतील यशानंतर हे बालसभा मॉडेल २४ तालुक्यांतील १५७२ ग्रामपंचायतींमध्ये राबविला गेले, ज्यात ३०,९२७ पेक्षा जास्त मुलांचा सक्रिय सहभाग झाला. हा उपक्रम केवळ वर्तन सुधारण्यापुरता मर्यादित न राहता गावपातळीवरील शासन प्रक्रियेत मुलांच्या सहभागाची क्रांती घडवत आहे.



## ४. पुढील दिशा

बालसभांमधून समोर येणा-या गरजा आणि कल्पना ग्रामपंचायतीच्या विकास आराखड्यात नियमित समाविष्ट करण्याचे काम सुरू ठेवणे आवश्यक आहे, जेणेकरून प्रत्येक मुलाचा आवाज ग्रामस्तरीय निर्णयप्रक्रियेत ठसा उमटवू शकेल. मुलांच्या नेतृत्व, निर्णयक्षमता, संवाद कौशल्य आणि सामाजिक जबाबदारी वाढीसाठी सातत्यपूर्ण प्रशिक्षण व मार्गदर्शन देणे महत्त्वाचे आहे. पालक, शिक्षक, स्वयं-सहाय्यता गट आणि बालसभांमध्ये सक्रिय सहभागी करून मुलांच्या विचारांचा प्रभाव अधिक व्यापक करणे आवश्यक आहे. बालसभेतील चर्चेचे, ठरावांचे आणि यशस्वी प्रकल्पांचे दस्तऐवजीकरण करून इतर जिल्ह्यांमध्ये प्रसारित करणे गरजेचे आहे, जेणेकरून बालसुलभ गावांच्या निर्मितीस व्यापक चालना मिळेल.





# प्रत्येक गावामध्ये बालसभा व्हाव्यात

## तहसीलदार श्रीधर पाटील : पाडलोसमध्ये ओम गणेश बालसभेस सदिच्छा भेट

**मडुरा : पुढारी वृत्तसेवा**

पाडलोस गावातील मुले एकत्र येऊन 'ओम गणेश बालसभा' हा चांगला उपक्रम राबवत आहात. पहिल्यांदाच अशी बालसभा मी बघत आहे. अतिशय चांगला उपक्रम आहे. प्रत्येक गावामध्ये अशी बालसभा व्हायला पाहिजे, असे उद्गार सावंतवाडी तहसीलदार श्रीधर पाटील यांनी काढले.

पाडलोस-देऊळवाडी येथे पंचायत राज संस्था आणि समुदाय आधारित संघटना अंतर्गत ओम गणेश बालसभेचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी सावंतवाडी तहसीलदारांनी कुटुंबासह उपस्थित राहत मुलांना शुभेच्छा दिल्या. व्यासपीठावर ओम गणेश बालसभा अध्यक्ष सानिका गावडे, सचिव गौतमी केणी, कोषाध्यक्ष साईश नाईक, सहसचिव दिशा पाडलोस्कर,



**पाडलोस : ओम गणेश बालसभेच्या सदस्यांसमवेत सावंतवाडी तहसीलदार श्रीधर पाटील. सोबत उपसरपंच राजू शेटकर, पालक, ग्रामस्थ आदी.**

उपसरपंच राजू शेटकर, मळेवाड प्रभाग सीएलएफ प्रचिती मडुरकर, पाडलोस श्री स्वामी समर्थ ग्रामसंघ अध्यक्ष मयुरी हरिजन, सचिव मयुरी कुबल, लिपिका शीतल गावडे, जिल्हा परिषद शाळा नं.१ च्या अध्यक्ष तेजल गावडे, पाडलोस सहकारी सोसायटी व्हाईस चेअरमन विश्वनाथ नाईक, आशासेविका विजया गावडे, पालक शिवराम पाडलोसकर उपस्थित होते.

विद्यार्थ्यांच्या कलागुणांना वाव देणे व त्यांना प्रोत्साहन देण्यासाठी सर्व पालकांनी बालसभा नियमित होण्यासाठी आग्रह धरला. बालसभेत विद्यार्थ्यांनी गणितांची आकडेवारी, छत्रपती शिवाजी महाराज, लोकमान्य टिळक यांच्याबद्दल माहिती सांगितली. तर काही विद्यार्थ्यांनी संध्याकाळच्या वेळी एसटीचा फलक वेगळाच असल्याचे सांगितले. आशासेविका विजया गावडे यांनी आरोग्य विषयक माहिती दिली.

सूत्रसंचालन शीतल गावडे यांनी केले. प्रास्ताविक मयुरी कुबल यांनी करत बालसभेचे महत्त्व सांगितले. तेजल गावडे यांनी मैत्री दिनाबद्दल मार्गदर्शन करत आभार मानले.

**मी पुन्हा येईन!**

लहान मुलांसोबत सविस्तर चर्चा करण्यासाठी तसेच त्यांच्या संस्कारात भर घालण्यासाठी मी पुन्हा येणार असल्याची ग्वाही, सावंतवाडी तहसीलदार श्रीधर पाटील यांनी दिली. तसेच निदान चार तास तरी आपल्या कुटुंबासमवेत मी पाडलोस ओम गणेश बालसभेला येणार असल्याचा शब्द तहसीलदार पाटील यांनी मुलांना दिला.

Sindhudurg Edition
Aug 04, 2025 Page No. 05







छायाचित्र: प्रकल्प अंमलबजावणी क्षेत्रातील विविध ग्राम पंचायतीमधील बालसभा उपक्रम

# यशोगाथा ८: ग्रामसभा ते ग्राम विकास – दिव्यांग व्यक्तींसाठी समावेशक GPDP निधी वाटप

### (उत्तर सोलापूर तालुका, सोलापूर जिल्हा, महाराष्ट्र)

## १. संदर्भ

PRI–CBO अभिसरण प्रकल्पाचा एक महत्वाचा उद्देश सामाजिक समावेश सुनिश्चित करणे आहे. उत्तर सोलापूर तालुक्यात दिव्यांग व्यक्तींना अधिकारांबाबत आणि ग्रामपंचायतीत उपलब्ध ५% GPDP निधीचा वापर करण्याबाबत जागरूकता कमी असल्याचे आढळले. अनेक वेळा निधीच्या कमतरतेमुळे किंवा माहितीच्या अभावामुळे पात्र व्यक्तींना त्यांच्या गरजा पूर्ण करण्यास अडचणी येत होत्या. या पार्श्वभूमीवर CLF नेत्यांनी हक्क आधारित दृष्टीकोनातून पुढाकार घेतला, ज्यामुळे दिव्यांग व्यक्तींच्या गरजा अधिक प्रभावीपणे आणि व्यवस्थित पद्धतीने ग्रामपंचायतीच्या विकास आराखड्यात समाविष्ट केल्या जाऊ शकतील.

## २. उपक्रम

उपक्रमाची अंमलबजावणी SHG महिला, CBO सदस्य आणि स्थानिक संसाधन व्यक्ती (LRP) यांच्या समन्वयाखाली करण्यात आली. सात ग्रामपंचायतींमध्ये ११४ दिव्यांग व्यक्तींचा नकाशा तयार करून त्यांची माहिती सत्यापित केली गेली. ग्रामसंघ व CLF सदस्यांनी समुदायामध्ये जनजागृती अभियान राबवले, चर्चासत्रांचे आयोजन केले आणि ग्रामसभेत पात्र कुटुंबांची उपस्थिती सुनिश्चित केली. ज्या व्यक्तींना ग्रामसभेत येणे शक्य नव्हते, त्यांच्यासाठी वाहतूक व्यवस्था केली गेली.

VPRP प्रक्रियेतून तयार झालेल्या मागण्यांची यादी ग्रामसभेत औपचारिकरित्या सादर करण्यात आली, ज्यामध्ये दिव्यांग व्यक्तींशी संबंधित सेवा, सहाय्यक साधने, उपजीविका व घरगुती गरजा यांचा समावेश होता. ग्रामपंचायतीकडून निधी मंजुरीसाठी विनंती प्रभावी पद्धतीने मांडण्यात आली आणि सर्व संबंधित घटकांनी चर्चा व समन्वय करून निर्णय प्रक्रियेत सहभागी होणे सुनिश्चित केले.



## ३. परिणाम

या उपक्रमामुळे सात ग्रामपंचायतींमध्ये एकूण २६ लाख निधी मंजूर झाला, ज्याचा थेट लाभ ११४ दिव्यांग व्यक्तींना मिळाला. एका ग्रामपंचायतीत १.२ लाख वितरण केले गेले, जिथे ४० व्यक्तींना प्रत्येकी ₹३,००० देण्यात आले. इतर ग्रामपंचायतींमध्ये निधीचा उपयोग विविध गरजांसाठी करण्यात आला: घरगुती उपकरणे (मिक्सर, पंखे, जलशुद्धी यंत्र), उपजीविका उपक्रमासाठी समर्थन, तसेच आर्थिकदृष्ट्या कुटुंबाला सहाय्य करणे शक्य झाले आहे.

या निधी वाटपामुळे केवळ भौतिक मदत मिळाली नाही, तर दिव्यांग व्यक्तींना त्यांच्या अधिकारांची जाणीव झाली आणि सामाजिक समावेशाचा संदेश गावस्तरावर स्पष्टपणे पोहोचला. उपक्रमामुळे ग्रामपंचायतीच्या निर्णयप्रक्रियेत दिव्यांग व्यक्तींचा प्रभाव वाढला, स्थानिक संस्थांमध्ये समन्वय दृढ झाला, आणि सहभागितेवर आधारित ग्रामविकासाची दिशा अधिक सुसंगत झाली करण्यात यश आले.




## ४. पुढील दिशा

हे मॉडेल आता दीर्घकालीन व शाश्वत स्वरूपात स्थापित केले जात आहे. ग्रामसंघ (VO) आणि CLF माध्यमातून दिव्यांग व्यक्तींशी संबंधित मुद्यांवर सातत्यपूर्ण फॉलो-अप सुरू राहणार आहे. आरोग्य, सामाजिक कल्याण, MGNREGA व इतर विभागांबरोबर अधिक प्रभावी अभिसरण साधल्यास सहाय्यक साधने, पेन्शन्स, समावेशक पायाभूत सुविधा आणि उपजीविका या सर्व बाबींमध्ये व्यापक पाठबळ मिळेल.

यामुळे दिव्यांग व्यक्तींचा समावेश आता ग्रामपातळीवरील निर्णय प्रक्रियेत अनिवार्य घटक बनला आहे. भविष्यात, या उपक्रमाचा अनुभव इतर तालुके आणि जिल्ह्यांमध्ये प्रसारित करून, महाराष्ट्रात ग्रामीण विकास अधिक समावेशक, उत्तरदायी आणि न्यायसंगत बनवण्यास चालना मिळेल.





छायाचित्र : उत्तर सोलापूर तालुक्यातील ग्रामपंचायतीमार्फत पात्र दिव्यांग लाभार्थ्यांना शासनाच्या योजनेंतर्गत आर्थिक सहाय्याचा निधी वितरित करताना.

# यशोगाथा ९: "छोट्या छोट्या गोष्टी, मोठे बदल" PRI–CBO अभिसरण प्रकल्पांतर्गत समुदाय-आधारित प्लास्टिक कचरा व्यवस्थापन (कळंब तालुका, यवतमाळ जिल्हा, महाराष्ट्र)

## १. संदर्भ

PRI–CBO अभिसरण प्रकल्पाच्या माध्यमातून कळंब तालुक्यात प्लास्टिक कचरा आणि त्याचे खुले ज्वलन ही गंभीर आणि लपलेली समस्या समोर आली होती. स्थानिक स्वयं-सहाय्यता गट (SHG) महिलांच्या बैठकीत असे दिसून आले की घरगुती स्वयंपाकासाठी आणि इतर उपक्रमांसाठी प्लास्टिकचा सतत वापर होत असून त्याचा आरोग्य आणि पर्यावरणावर प्रतिकूल परिणाम होत आहे. प्रकल्पांतर्गत, काही ग्रामपंचायतींमधील सदस्यांनी केरळमधील सॉलिड वेस्ट मॅनेजमेंटच्या यशस्वी मॉडेलचे निरीक्षण केले आणि त्यातून मिळालेल्या अनुभवाचा आधार घेऊन या समस्येचा सामना करण्यासाठी ग्रामपंचायतींसह सहयोगाने समुदाय-आधारित उपक्रम राबविण्याची गरज ओळखली गेली.

## २. उपक्रम

MSRLM आणि कुडुम्बश्री NRO च्या सहकार्याने ग्रामपंचायतीसह सह-संयोजित सहा महिन्यांचा व्यापक कचरा व्यवस्थापन कार्यक्रम राबविण्यात आला. या उपक्रमाची रणनीती जनजागृती, वर्तन बदल (4RS – REDUCE, REUSE, RECYCLE, REPLACE) आणि विभागीय अभिसरण या घटकांवर आधारित होती.
मुख्य उपक्रमांतर्गत पुढील कार्यवाही राबविण्यात आली:

- स्वयं-सहाय्यता गट संघटनांच्या माध्यमातून स्टीलचे भांडे वाटप करून एकदा वापरल्या जाणाऱ्या प्लास्टिकचा वापर कमी करणे.
- सणासुदीच्या प्रसंगी कापडी पिशव्या वाटप करून पर्यावरणपूरक सणाला प्रोत्साहन देणे.
- शाळांमध्ये रॅली, घोषवाक्य मोहिमा व जागरूकता कार्यक्रम आयोजित करणे; उघड्यावर शौच निरीक्षणासाठी ग्रामपंचायतीच्या सहकार्याने सकाळच्या गस्ती पथक व्यवस्था चालविणे.
- SBM अंतर्गत सार्वजनिक शौचालयांचे बांधकाम व कचरा व्यवस्थापन सुविधा कार्यान्वित करणे.
- MGNREGA योजना अंतर्गत पिट्स, कंपोस्ट युनिट्स आणि बायोगॅस प्लांट प्रस्तावित करणे.

या उपक्रमांतर्गत ग्रामपंचायती, VO आणि SHG सदस्यांनी सतत संवाद साधला, कामाचे नियोजन केले आणि प्लास्टिक वापर कमी करण्यासाठी समुदायात वर्तन बदलाचे संदेश पोहोचवले गेले.

## ३. परिणाम

सततच्या जनजागृतीमुळे प्लास्टिक जाळण्याचे प्रमाण लक्षणीय प्रमाणात कमी झाले आहे. स्थानिक समुदाय आता कचरा व्यवस्थापनाच्या आरोग्यधोक्यांची जाणीव ठेवत आहेत, आणि ग्रामपंचायती GPDP मध्ये कचरा व्यवस्थापन संबंधित पायाभूत सुविधा समाविष्ट करत आहेत. स्वयं-सहाय्यता गट आणि ग्रामसंघांनी जागरूकता, सल्ला मसलती आणि प्रत्यक्ष उपाययोजना राबविण्यात नेतृत्व स्वीकारले. एका सदस्याच्या जागरुकतेमुळे संपूर्ण घराला माहिती मिळते, आणि अनेक सदस्यांनी एकत्रित प्रयत्न केल्यास संपूर्ण गावात सकारात्मक बदल घडू शकतात.






## ४. पुढील दिशा

प्रकल्पांतर्गत सर्व तालुक्यातील ग्रामपंचायतींमध्ये या उपक्रमाचा विस्तार करण्याचे नियोजन आहे. जिल्हा व तालुका प्रशासनाच्या पाठबळासह, कचऱ्याचे धनात रूपांतर (WASTE-TO-WEALTH) सूक्ष्मउद्योग, द्रव व घन कचरा व्यवस्थापन सुधारणा आणि शाळांमध्ये पर्यावरण शिक्षण यावर विशेष लक्ष दिले जाणार आहे.

हा उपक्रम केवळ चर्चेपुरता मर्यादित न राहता, ग्रामपातळीवरील पर्यावरणीय व्यवस्थापन, सहभागी निर्णयप्रक्रिया आणि समुदाय-आधारित सुसंवादाची दिशा ठरवत आहे. यामुळे प्रत्येक नागरिकाची जबाबदारी जागृत होते, आणि ग्रामीण स्तरावर दीर्घकालीन, टिकाऊ परिवर्तन घडवण्याची प्रक्रिया सुरळीत होते.







छायाचित्र : PRI–CBO अभिसरण प्रकल्पांतर्गत समुदाय-आधारित प्लास्टिक कचरा व्यवस्थापन उपक्रम, कळंब तालुका, जिल्हा यवतमाळ, महाराष्ट्र

# यशोगाथा १०: सामूहिक प्रयत्नातून स्वच्छतेचा मार्ग – महिलाकेंद्रित स्वच्छता उपक्रम

## (आष्टा ग्रामपंचायत, भद्रावती तालुका, चंद्रपूर जिल्हा, महाराष्ट्र)

### १. संदर्भ

PRI–CBO अभिसरण प्रकल्पाच्या माध्यमातून UMED–MSRLM आणि कुडुम्बश्री NRO यांनी स्थानिक पातळीवरील महिलांच्या सहभागाला बळकटी देण्यावर आणि समुदाय-आधारित समस्यांवर परिणामकारक उपाय सुनिश्चित करण्यावर लक्ष केंद्रीत केले आहे.

आष्टा गावात, सुमारे २,२००–२,३०० लोकसंख्येसह, महिलांना दीर्घकाळपासून स्वच्छता संबंधित समस्यांचा सामना करावा लागत होता. शाळा, अंगणवाडी केंद्रे आणि आरोग्य उपकेंद्र उपलब्ध असतानाही, महिलांच्या आरोग्य, स्वच्छता आणि सुरक्षिततेच्या गरजा औपचारिक नियोजन प्रक्रियेत पर्याप्त प्रमाणात समाविष्ट झाल्या नव्हत्या. गावात सार्वजनिक शौचालयाचा अभाव असल्यामुळे महिलांना उघड्यावर शौच करावे लागत होते, ज्यामुळे त्यांची सुरक्षितता, आरोग्य आणि आत्मसन्मान धोक्यात येत होता. ग्रामपातळीवर VHNSC, नागरिक समित्या (CITIZENS' COMMITTEE) तसेच GPCC व्यासपीठ उपलब्ध होते; मात्र या संस्थांचा महिलांच्या आवाजाला मजबुती देण्याचा संभाव्य लाभ पूर्णपणे मिळत नव्हता.

मिनाक्षी रामू जामदडे, गावातील अनेक महिलांप्रमाणे सुरुवातीला सार्वजनिक मंचावर बोलण्यास संकोच करत होत्या. PRI–CBO प्रकल्पाच्या परिचयामुळे महिलांच्या सहभाग, पंचायत कार्यपद्धती, GPCC, VHNSC आणि नागरिक समित्यांची भूमिका यावर चर्चेला सुरुवात झाली. LRPS, BRPS आणि DRPS यांच्या सतत मार्गदर्शनामुळे मिनाक्षीने हळूहळू समजून घेतले की या व्यासपीठांचा वापर करून ग्रामसमस्यांवर संरचित आणि सामूहिक उपाय करता येऊ शकतात.



## २. उपक्रम

महिला गटांद्वारे आणि समित्यांमधील बैठकीत स्वच्छता हा प्राथमिक विषय म्हणून उभा राहिला. सार्वजनिक शौचालय नसल्यामुळे महिलांना सकाळी लवकर किंवा रात्री उशिरा उघड्यावर जावे लागे, ज्यामुळे त्यांच्या आरोग्य, सुरक्षितता आणि आत्मसन्मानावर गंभीर परिणाम होत होते. या अनुभवांना VHNSC मध्ये नोंदवून त्यावर चर्चा केली गेली आणि स्वच्छतेला सार्वजनिक आरोग्य व सुरक्षिततेच्या मुद्द्याप्रमाणे मान्यता देण्यात आली.

PRI–CBO प्रकल्पाच्या पाठबळासह मिनाक्षी आणि इतर महिलांनी मोठ्या संख्येने एकत्र येऊन ग्रामसभेत हा विषय मांडला. VHNSC ने आरोग्य आणि स्वच्छतेशी संबंधित मुद्द्यांना एकत्र जोडून समुदायाचा संमतीसह मुद्दा सादर केला. जागरूकता सत्रे, मार्गदर्शन व पूर्वतयारी बैठकींमुळे महिलांनी ग्रामसभेत आत्मविश्वासाने आपले विचार मांडले. सार्वजनिक संवाद, ग्रामपंचायत प्रतिनिधी व निवडून आलेल्या पदाधिकारी यांच्याशी सातत्यपूर्ण चर्चा करून महिलांनी स्वच्छता विषयाला प्राथमिकता दिली. परिणामी, ग्रामसभेत महिला समुदायासाठी सार्वजनिक शौचालय उभारणीचा ठराव मंजूर झाला. ग्रामपंचायत आणि सार्वजनिक सहभागासह शौचालयाचे बांधकाम यशस्वीपणे पूर्ण झालेले आहे.




## ३. परिणाम

महिला समुदायासाठी सार्वजनिक शौचालय उभारणीमुळे आष्टा गावातील दैनंदिन जीवनात मोठा बदल झाला. पूर्वी असलेली भिती, अस्वस्थता आणि अपमानाची भावना आता सुरक्षित आणि प्रवेशयोग्य सुविधेमुळे दूर झाली. महिलांना उघड्यावर शौच करताना भौतिक धोका किंवा मानसिक ताण येत नाही, ज्यामुळे त्यांच्या आरोग्य, सुरक्षितता आणि स्वच्छतेच्या सवयींमध्ये सुधारणा झाली.

भौतिक सुविधा सुधारण्यापेक्षा महत्त्वाचे म्हणजे सामाजिक आणि संस्थात्मक परिवर्तन झाले. नागरिक समिती एक सक्रिय आणि विश्वासार्ह व्यासपीठ म्हणून उभी राहिली, जिथे आरोग्य, पोषण आणि स्वच्छता विषयक चर्चासत्रे प्रभावीपणे आयोजित केली जातात. पूर्वी सार्वजनिक मंचावर बोलण्यास संकोच करणाऱ्या महिलांनी आता ग्रामसभेत धैर्याने सहभाग नोंदवला, सामाजिक बंधने मोडली आणि आपला आवाज ऐकवण्याचा हक्क सिद्ध केला.

## ४. पुढील दिशा

आष्टा गावातील अनुभव दाखवतो की, ग्रामपंचायत पातळीवरील समित्यांना कार्यक्षम व्यासपीठ म्हणून अधिक सुदृढ करणे आवश्यक आहे. मिनाक्षी रामू जामदडे आणि इतर महिलांनी या समित्यांमध्ये सक्रिय सहभाग चालू ठेवून आरोग्य, पोषण, स्वच्छता आणि सुरक्षितता मुद्द्यांना ग्रामविकासाच्या केंद्रस्थानी ठेवणे गरजेचे आहे. समिती सदस्यांची सातत्यपूर्ण क्षमता-वृद्धी, नियमित बैठकांचे आयोजन आणि ग्रामपंचायतसह मजबूत संबंध प्रस्थापित करणे आवश्यक आहे.






छायाचित्र : सामूहिक सहभागातून स्वच्छतेकडे वाटचाल घडविणारा स्वच्छता उपक्रम आष्टा ग्रामपंचायत , ता. भद्रावती, जि. चंद्रपूर, महाराष्ट्र

# यशोगाथा ११: “महिला सशक्तीकरण आणि उपजीविका” – PRI–CBO अभिसरण प्रकल्प

## (देवगड तालुका, सिंधुदुर्ग जिल्हा, महाराष्ट्र)

### १. संदर्भ

देवगड तालुक्यातील अनेक ग्रामपंचायतांच्या ग्रामपंचायत विकास आराखड्यात (GPDP) महिलांच्या उपजीविका वाढीसाठी तरतुदी आधीच समाविष्ट होत्या. तरीही, महिलांचा सामूहिक सहभाग कमी असल्याने आणि ग्रामसभेत मागण्यांचा प्रभावीपणे मांडणी न झाल्यामुळे या तरतुदींचा पूर्ण वापर होत नव्हता. अनेक महिला नियोजन प्रक्रियेत निष्क्रिय सहभाग घेत होत्या, आणि उपजीविकेसंबंधित मागण्या सहसा सामूहिक स्वरूपात मांडल्या जात नव्हत्या.

PRI–CBO अभिसरण प्रकल्पाच्या माध्यमातून, महिलांच्या स्वयं-सहाय्यता गटांना (SHGS) आणि ग्रामसंघांना (VOS) सशक्त करण्यावर विशेष लक्ष दिले गेले, तसेच महिलांना पंचायत राज संस्थांशी प्रभावी संवाद साधता यावा यासाठी प्रक्रिया राबविण्यात आल्या. ग्रामसभा सहभागीकरण, नकाशांकन आणि ग्राम सतत समृद्धी आराखडा (VPRP) तयार करणे या संरचित प्रक्रियांद्वारे महिलांच्या उपजीविकेसंबंधित गरजा ओळखून त्या स्थानिक नियोजन प्रक्रियेत आणल्या गेल्या.

### २. उपक्रम

देवगड तालुक्यात ९ जानेवारी २०२५ रोजी सरपंचांसाठी तालुका पातळीवरील मार्गदर्शन आयोजित करण्यात आले. त्यानंतर कुडुम्बश्री-NRO मार्गदर्शक, गिरीजा संतोष मंडम यांनी ग्रामपातळीवर SHG सदस्य, VO प्रतिनिधी आणि ग्रामपंचायत अधिकारी यांच्यासोबत थेट संवाद साधला. केरळमधील महिला नेतृत्वाखालील उपजीविका उपक्रमांचे प्रात्यक्षिक उदाहरण देत, मार्गदर्शकांनी सामूहिक नियोजन, मागण्यांची प्रभावी मांडणी, आणि ग्रामपंचायतांशी परिणामकारक संवाद यावर भर दिला.

तालुक्यातील अनेक ग्रामपंचायतांमध्ये सक्रिय ग्रामसभा सहभागीकरण, सार्वजनिक साधने आणि सेवा नकाशांकन (PGSRD), तसेच VPRP प्रक्रिया राबविण्यात आल्या. यामुळे महिलांच्या संघटनांना उपजीविकेसंबंधित प्राधान्य ठरवता आले आणि संघटित मागण्यांचा ग्रामसभेत सादरीकरण करता आले. परिणामी, देवगड तालुक्यातील अनेक ग्रामपंचायतांनी SHG आणि महिला संघटनांसाठी GPDP आणि इतर पंचायत निधीतून उपजीविका-संबंधित साधने मंजूर केली.

### ३. परिणाम

प्रकल्पाच्या अभिसरण प्रक्रियेमुळे देवगड तालुक्यातील अनेक ग्रामपंचायतांमध्ये प्रत्यक्ष उपजीविका सहाय्य मिळाले:

- डाभोले ग्रामपंचायत: ग्रामसंघासाठी पाच शिवण मशीन मंजूर.



- पाडेल ग्रामपंचायत: विधवांसाठी GP निधीतून शिवण मशीन उपलब्ध.
- कुवले-रेम्बवळी ग्रामपंचायत: रमेश्वर महिला ग्रामसंघासाठी एक शिवण मशीन आणि एक पिको-फॉल मशीन मंजूर.
- कुंकेश्वर ग्रामपंचायत: UMED आणि MAVIM महिला गटांना ५०० प्लेट, ५०० ग्लास आणि १,००० वहया वाटप.
- वाघोटण ग्रामपंचायत: १५वी वित्त आयोग निधीतून संगणक, झेरॉक्स मशीन आणि प्रिंटर मंजूर.
- पूराळ ग्रामपंचायत: पापड व अगरबत्ती बनवण्याची मशीन मंजूर;
- तळवडे ग्रामपंचायत: मसाला दळण्याची मशीन मंजूर.
- चांदोशी ग्रामपंचायत: भांडी संच मंजूर.
- तिरालोट ग्रामपंचायत: पत्रवली (पाने) बनवण्याची मशीन मंजूर.

या प्रक्रियेमुळे महिला SHG सदस्य निष्क्रिय सहभागातून GPDP साधनांच्या सक्रिय मागणीत सहभागी होण्याच्या स्थितीत आले. परिणामी, त्यांचा आत्मविश्वास वाढला, उपजीविका साधनांवर प्रवेश सुधारला, आणि ग्रामस्तरीय आर्थिक नियोजनात त्यांचा सहभाग दृढ झाला.

## ४. पुढील दिशा

देवगड तालुक्याचा अनुभव दाखवतो की, महिलांचा सामूहिक आवाज मजबूत करणे GPDP उपजीविका तरतुदी सक्रिय करण्यासाठी अत्यंत महत्वाचे आहे. भविष्यात SHGS आणि VOS यांना नियमितपणे उपजीविका संधी ओळखण्यास, ग्रामसभेत सामूहिक मागण्या मांडण्यास, तसेच GPDP निधीच्या मंजुरी व वापराचे सातत्यपूर्ण परीक्षण करण्यास समर्थ केले जाईल. PRI–CBO अभिसरण प्रक्रियेचा सातत्यपूर्ण वापर महिलांचा स्थानिक आर्थिक नियोजनात सहभाग सुनिश्चित करेल आणि तालुक्यातील ग्रामपंचायतांमध्ये लिंग-संवेदनशील, टिकाऊ उपजीविका सहाय्याची खात्री करेल.









छायाचित्र : उपजीविकेच्या संधींमध्ये महिलांचा सक्रिय सहभाग” – PRI–CBO अभिसरण प्रकल्प

# यशोगाथा १२: “महिला नेतृत्वातून बदल: PRI–CBO अभिसरण प्रकल्पाद्वारे मद्यपान समस्येवर उपाय”

### (अर्जुनी मोर तालुका, गोंदिया जिल्हा, महाराष्ट्र)

## १. संदर्भ

अर्जुनी मोर तालुका हा मुख्यतः आदिवासी क्षेत्र असून सामाजिक आणि आर्थिक असुरक्षितता येथे खोलवर रुजलेली आहे. २०२३–२५ दरम्यान, PRI–CBO अभिसरण प्रकल्प हा तालुक्यात राबविला गेला, ज्याचा उद्देश ग्रामपातळीवरील सहभाग वाढवणे आणि संघटित नियोजन प्रक्रियांद्वारे गरिबी व सामाजिक समस्या सोडवणे हा होता. प्रकल्पाचा भाग म्हणून ग्रामपंचायत समन्वय समित्या (GPCC) स्थापन केल्या गेल्या, ज्यायोगे ग्राम सतत समृद्धी आराखडा (VPRP) प्रभावीपणे राबवला जाऊ शकेल.

VPRP च्या सामाजिक विकास आराखड्यांतर्गत विविध उपक्रमांमध्ये, ग्रामपातळीवरील मुद्दे GPCC बैठकीत आणि महिला गटांच्या चर्चांमध्ये तपशीलवार मांडले गेले. अनेक गावांमध्ये, महिलांनी सातत्याने मद्यपानाला प्रमुख सामाजिक समस्या म्हणून ओळखले. मद्याचे दुष्परिणाम घरगुती संघर्ष, आर्थिक अस्थिरता आणि सामाजिक गोंधळ निर्माण करत असल्याचे आढळले, ज्यामुळे कुटुंबांचे जीवन, विशेषतः महिला आणि मुलांचे कल्याण गंभीरपणे प्रभावित झाले होते.

## २. उपक्रम

अर्जुनी मोर तालुक्यातील अनेक ग्रामपंचायतीमध्ये मद्यपान ही गंभीर समस्या असल्याचे ग्राम सतत समृद्धी आराखडा (VPRP) मध्ये समोर आले. महिलांनी फेडरेशन आणि ग्रामपातळीच्या बैठकीत ही बाब सातत्याने मांडली. स्थानिक संसाधन व्यक्ती (LRPS) आणि तालुका संसाधन व्यक्ती (BRPS) यांच्या सहकार्याने गावांमध्ये चर्चा राबवून ग्रामपंचायत प्रतिनिधींना औपचारिक प्रशासनाच्या माध्यमातून उपाययोजना करण्यासाठी सुचवले गेले. सुरुवातीला मद्यपान करणारे आणि विक्रीस गुंतलेले लोक विरोध व्यक्त करत होते, ज्यामुळे महिला नेत्यांमध्ये काही काळ निराशा निर्माण झाली.



तालुक्यातील सर्व ग्रामपंचायतीमध्ये व्यापक समस्या असल्यामुळे तालुका अभियान कक्ष मध्ये सर्व LRPS ची विशेष पुनरावलोकन बैठक आयोजित करण्यात आली. या बैठकीत केरळमधील कुडुम्बश्री NRO मार्गदर्शक, ब्लॉक मिशन मॅनेजर, BMMU कर्मचारी, DRPS आणि BRPS उपस्थित होते. चर्चेत मद्यपान समस्येला प्राधान्य देण्याचे ठरवले गेले आणि यावर तटस्थ, व्यावहारिक आणि गैर-संघर्षात्मक उपाययोजना आखण्यावर भर दिला गेला. यावेळी इंटिग्रेटेड डी-ॲडिक्शन सेंटर या संस्थेची ओळख करून देण्यात आली, जिथे मद्यपी व्यक्तींसाठी एक महिना मोफत उपचार दिला जातो.

यानंतर डी-ॲडिक्शन सेंटरसोबत समन्वय स्थापित केला गेला, आणि PRI प्रतिनिधींच्या सक्रिय पाठबळाने ग्रामपंचायत पातळीवर जागरूकता शिबिरे आयोजित करण्याचा आराखडा तयार केला गेला. ग्रामपंचायतांनी संस्थात्मक पाठबळ पुरवून समाजसहभाग सुनिश्चित केला आणि डी-अॅडिक्शन उपक्रमास सामूहिक सामाजिक जबाबदारीचे रूप दिले. अर्जुनी मोर तालुक्यातील ७१ ग्रामपंचायतीपैकी ३२ ग्रामपंचायतीमध्ये जागरूकता शिबिरे आयोजित केली गेली. या शिबिरांत महिलांचा आणि समुदायाचा सक्रिय सहभाग झाला, ज्यामुळे मद्यनिर्भर व्यक्तींची ओळख, सल्ला देणे आणि उपचारासाठी संदर्भित करणे यावर भर देण्यात आला.

## ३. परिणाम

जागरूकता आणि समुदाय-सहभागामुळे विविध ग्रामपंचायतीतील १४ मद्यपान करणारे व्यक्ती डी-ॲडिक्शन सेंटरमध्ये दाखल होऊन एक महिना मोफत उपचार घेण्यास पात्र ठरल्या. उपचारानंतर या व्यक्तींमध्ये आरोग्य आणि वर्तनात लक्षणीय सुधारणा दिसली, आणि त्यांनी मद्यपान थांबवले. या बदलामुळे थेट त्यांच्या कुटुंबांवर सकारात्मक परिणाम झाला, म्हणजे १४ कुटुंबे मद्यपानामुळे निर्माण झालेल्या सामाजिक, आर्थिक व मानसिक त्रासातून मुक्त झाली आहेत.

व्यक्तीगत कुटुंबांपलीकडे हा परिणाम विस्तारित झाला. घरगुती शांतता वाढली, वाद कमी झाले आणि आर्थिक व्यवस्थापन सुधारले. मद्यपान कमी झाल्यामुळे मुलांवर व समुदायावरही त्याचा नकारात्मक परिणाम कमी झाला, ज्यामुळे समस्या पुढे पसरू नये याची शक्यता निर्माण झाली. महिलांनी सामूहिक क्रियाशीलतेमुळे सशक्तीकरणाची भावना व्यक्त केली, आणि PRI–CBO अभिसरण प्रक्रियांवर समुदायाचा विश्वास वाढला. महिला संवेदनशील सामाजिक मुद्दे औपचारिक प्रशासनिक मंचावर मांडण्यासाठी अधिक सक्षम झाल्या. लाभार्थी कुटुंबांनी प्रकल्प, LRPS आणि प्रशासनाचे आभार मानले.

## ४. पुढील दिशा

अर्जुनी मोर अनुभव दाखवतो की PRI–CBO अभिसरण, VPRP आणि GPCC संरचनांच्या माध्यमातून जटिल सामाजिक समस्यांवर प्रभावी उपाययोजना करता येते. पुढे, तालुक्यातील उर्वरित ग्रामपंचायतांमध्ये या उपक्रमाचा विस्तार करणे, सातत्यपूर्ण जागरूकता कार्यक्रम, फॉलो-अप सल्लामसलत, आणि व्यसनमुक्त व्यक्तींना सहाय्य करणारी यंत्रणा तयार करणे आवश्यक आहे. GPCCS आणि महिला संघटनांचा सशक्तीकरण महत्त्वाचे राहील, जेणेकरून दीर्घकालीन सामाजिक कल्याण सुनिश्चित करता येईल. अशा समुदाय-नेतृत्वाखालील उपक्रमांच्या संस्थात्मकरणामुळे आदिवासी भागातील समावेशी आणि टिकाऊ ग्रामीण विकासाला मोठा हातभार लागेल.









छायाचित्र : मद्यपानाच्या समस्येवर उपाययोजना करण्यासाठी एकत्रित येऊन सामूहिक चर्चा व निर्णयप्रक्रिया घडविणारा समुदाय, अर्जुनी मोर तालुका, जि. गडचिरोली

# यशोगाथा १३: अंगठ्याचा ठश्या पासून सहीपर्यंत : अक्षरज्योती

## (निधा ग्राम पंचायत, ता.राळेगाव, यवतमाळ)

### १. संदर्भ

यवतमाळ जिल्ह्याच्या राळेगाव तालुक्यातील निधा ग्रामपंचायत PRI–CBO अभिसरण प्रकल्पात समाविष्ट झाली, जी कुडुंबश्री NRO च्या पाठबळासह राबविण्यात आली. ग्रामस्तरावरील नियोजन प्रक्रियेत सहभागी होण्याच्या वेळी लक्षात आले की, गावातील काही महिला आणि वरिष्ठ नागरिकांना वाचन-लेखनाची मूलभूत क्षमता नाही आणि त्यांना शिकण्याची योग्य संधीही मिळालेली नाही. गावातील वरिष्ठ नागरिकांनी कधीच शाळा पूर्ण केलेली नव्हती आणि त्यांना पेंशन, SHG नोंदी तसेच ग्रामपंचायत दस्तऐवजांसाठी अंगठ्याचा ठसा वापरावा लागत होता. अगदी रोजच्या जीवनातील सोप्या कामांमध्येही, जसे की बसची पाटी वाचणे किंवा आकडे ओळखणे, यासाठी त्यांना इतरांवर अवलंबून राहावे लागत होते, ज्यामुळे त्यांचे स्वावलंबन, आत्मसन्मान आणि आत्मविश्वास प्रभावित होत होते.

या सामाजिक फरकाला समजून घेऊन प्रकल्पांतर्गत चर्चेला सुरुवात करण्यात आली की, या नागरिकांना साक्षरतेच्या माध्यमातून सक्षम करणे आवश्यक आहे.



### २. उपक्रम

एप्रिल २०२५ मध्ये निधा ग्रामपंचायतीत अक्षरज्योती उपक्रमाची सुरुवात करण्यात आली. हा कार्यक्रम स्थानिक संसाधन व्यक्ती (LRP) च्या मार्गदर्शनाखाली, ग्रामपंचायत आणि समुदाय-आधारित संस्थांच्या पाठबळासह राबविण्यात आला. ग्रामपंचायतीने दैनिक सत्रांसाठी संध्याकाळी शाळेतील वर्गखोल्या उपलब्ध करून दिल्या, तर रविवारी खुल्या शाळेच्या मैदानात सत्रे आयोजित केली गेली ज्यामुळे अधिक आरामदायक आणि आकर्षक शिक्षणाचे वातावरण तयार झाले.

उपक्रमाचा उद्देश वृद्धांसाठी कार्यात्मक साक्षरतेवर होता. सत्रांमध्ये अक्षरे व अंक ओळखणे, स्वतःचे नाव लिहिणे आणि हळूहळू अंगठ्याचा ठसा वापरण्याऐवजी सही करण्याची क्षमता विकसित करणे यावर लक्ष केंद्रीत केले गेले. याशिवाय, स्थानिक NGO च्या सहकार्याने सोपे शारीरिक व्यायाम व मानसिक व्यायाम उपक्रम देखील समाविष्ट केले गेले, ज्यामुळे चालण्याची क्षमता, आरोग्य व सर्वांगीण कल्याण सुधारण्यास मदत झाली.

LRP, समुदाय-आधारित संस्थांच्या सदस्य आणि पंचायतीचे प्रतिनिधी यांच्या सहकार्याने नियमित उपस्थिती सुनिश्चित केली गेली, व्यक्तिगतरित्या प्रोत्साहन दिले गेले आणि वृद्धांसाठी सन्मानजनक शैक्षणिक वातावरण तयार केले गेले.



## ३.परिणाम

अक्षरज्योती उपक्रमामुळे थोड्या काळात लक्षणीय बदल दिसून आला. किमान दहा वृद्ध सहभागी सहजपणे स्वतःचे नाव व सही शिकले, ज्यामुळे अंगठ्याचा ठसा वर अवलंबित्व कमी झाले आणि त्यांच्या आत्मविश्वासात महत्त्वपूर्ण वाढ झाली. ते ग्रामपंचायत सेवा, SHG मंच आणि सार्वजनिक प्रणालींमध्ये अधिक स्वतंत्रपणे सहभाग घेऊ लागले.

सामाजिक परिणाम देखील उल्लेखनीय होते. सत्रे सामाजिक संवादाचे व्यासपीठ बनली, एकटेपणा कमी झाला आणि सामूहिक सहभागाची भावना वाढली. वृद्ध सहभागी सत्रांना उत्सुकतेने येऊ लागले – केवळ शिकण्यासाठी नव्हे, तर सामाजिक संपर्कासाठी देखील. सोपे शारीरिक व्यायाम समाविष्ट केल्याने चालण्याची क्षमता व मानसिक जागरूकता सुधारली, ज्यामुळे शारीरिक आणि मानसिक स्वास्थ्य एकत्र वाढविण्याची संधी निर्माण झाली. ग्रामपंचायतीने या उपक्रमाला पाठबळ दिले व पुढील आर्थिक वर्षासाठी GPDP मध्ये समावेश करण्याचे निर्णय घेतले, ज्यामुळे उपक्रमाची शाश्वतता आणि स्वतःची मालकी सुनिश्चित झाली. हा उपक्रम स्थानिक सतत विकास ध्येयांशी (SDG 3 – उत्तम आरोग्य व कल्याण, SDG 4 – दर्जेदार शिक्षण) खूप निगडीत आहे आणि सिद्ध करतो की वृद्ध नागरिकांच्या विशिष्ट गरजांवर PRI–CBO अभिसरणाद्वारे स्थानिक उपाययोजनांनी प्रभावीपणे उत्तर देता येऊ शकते.


समान उपक्रम राज्यातील १२ प्रकल्प अंमलबजावणी जिल्ह्यांमध्ये राबविला गेला. या काळात १,१५८ ग्रामपंचायतींमध्ये ९,८१३ गरजूंना मूलभूत साक्षरता प्राप्त झाली, ज्यामुळे नागरिकांचा आत्मविश्वास व स्वावलंबन वाढले आणि स्थानिक सेवांमध्ये त्यांचा प्रभावी सहभाग सुनिश्चित झाला.








छायाचित्र : प्रकल्प अंमलबजावणी क्षेत्रातील विविध ग्रामपंचायतींमध्ये प्रौढ साक्षरता वर्गांच्या माध्यमातून साक्षरतेला चालना देणारे उपक्रम







छायाचित्र : प्रकल्प अंमलबजावणी क्षेत्रातील विविध ग्रामपंचायतींमध्ये प्रौढ साक्षरता वर्गांच्या माध्यमातून साक्षरतेला चालना देणारे उपक्रम





छायाचित्र : प्रकल्प अंमलबजावणी क्षेत्रातील विविध ग्रामपंचायतींमध्ये प्रौढ साक्षरता वर्गांच्या माध्यमातून साक्षरतेला चालना देणारे उपक्रम

# यशोगाथा १४: “उपजीविकेच्या संधींनी सशक्त महिला” – PRI–CBO अभिसरण प्रकल्प

## (संगमेश्वर तालुका, रत्नागिरी जिल्हा, महाराष्ट्र)

### १.संदर्भ

PRI–CBO अभिसरण प्रकल्पांतर्गत ग्रामस्तरीय महिलांना त्यांच्या उपजीविकेच्या गरजा आणि प्राधान्यक्रम निश्चित करण्यासाठी ग्राम सतत समृद्धी आराखडा (VPRP) च्या माध्यमातून मार्गदर्शन करण्यात आले. महिलांच्या मागण्या संकलित करून ग्रामसभेत सादर करण्यात आल्या आणि त्या ग्रामपंचायत विकास आराखड्याचा (GPDP) भाग बनल्या. १५ व्या वित्त आयोगाच्या पाठबळासह काही उपजीविकेच्या मागण्या मंजूर होऊन निधी उपलब्ध करून देण्यात आला. या उपक्रमाचा उद्देश महिलांना स्वतःच्या व्यवसायाची सुरुवात किंवा बळकटी देणे, उत्पन्न वाढवणे आणि त्यांच्या कुटुंबाच्या भल्यासाठी आधार तयार करणे होता.

### २.उपक्रम

ग्रामपंचायतींच्या आणि स्वयं-सहाय्यता गटांच्या (SHG) सहभागातून महिलांच्या उपजीविकेच्या गरजा VPRP व GPDP नियोजन प्रक्रियेत निश्चित केल्या गेल्या. मंजुरीनंतर १५ व्या वित्त आयोगाच्या निधीतून साधने व साधनसामग्री उपलब्ध करून देण्यात आली, ज्याद्वारे महिलांनी उत्पन्ननिर्मितीच्या उपक्रमांचा लाभ घेता येईल. महिलांना उपकरणांचा योग्य वापर करण्याचे मार्गदर्शन, त्यांच्या उपजीविकेला कुटुंब कल्याण, मुलांचे शिक्षण व आरोग्य जागरूकतेशी कसे जोडायचे हे समजावून सांगण्यात आले. ग्रामपंचायत सदस्य आणि स्थानिक समन्वयकांनी प्रगतीवर सातत्याने लक्ष ठेवले आणि आवश्यक ते मार्गदर्शन उपलब्ध करून दिले.



### ३.परिणाम / साध्ये

- मखाजन गावातील ३१ SHG (प्रगती महिला ग्रामसंघ, ३६५ कुटुंबे) यांना पापड बनविण्याची मशीन (RS. ७०,०००) उपलब्ध करून देण्यात आली.
- कोन्ड आसुरडे गावातील १८ महिलांना (सिद्धिविनायक ग्रामसंघ) घरगुती उपजीविकेसाठी घरघंटी (पिठ दळण्यासाठी) (RS. १८,०००) पुरवण्यात आली.
- धामापूर गावातील ६ SHG (कृष्णा महिला ग्रामसंघ) यांना ६ शिवण मशीन (₹७६,०००) आणि मसाला दळण्याची मशीन (RS. ४५,०००) मिळाली.

या साधनसामग्रीमुळे महिलांनी उत्पन्न वाढवले, कुटुंब स्थिती सुधारली, मुलांच्या शिक्षणासाठी आधार निर्माण केला आणि आरोग्य व स्वच्छतेबाबत जागरूकता वाढवली. या उपक्रमामुळे महिलांचा आत्मविश्वास वाढला आणि त्यांना स्थानिक निर्णय प्रक्रियेत सक्रिय सहभागी होण्याची संधी मिळाली.

### ४. पुढील दिशा

आगामी काळात महिलांनी GPDP च्या माध्यमातून त्यांच्या उपजीविकेच्या गरजा आणि विकासाच्या प्राधान्यक्रमांची आखणी आणि अंमलबजावणी सुरू ठेवावी. ग्रामपंचायतीकडून सातत्यपूर्ण पाठबळ व प्रोत्साहन मिळाल्यास, महिलांना त्यांच्या हक्कांसाठी आवाज उठवता येईल आणि त्यांनी कुटुंब व समुदायाच्या विकास निर्णयांमध्ये सक्रिय भूमिका बजावता येईल. हा उपक्रम केवळ आर्थिक सशक्तिकरणापुरता मर्यादित न राहता, स्थानिक नेतृत्व, आत्मनिर्भरता आणि सामाजिक सशक्तीकरणाला चालना देणारा ठरेल.





# यशोगाथा १५: “महिलांचा सहभाग – गाव विकासाची गुरुकिल्ली” – PRI–CBO अभिसरण प्रकल्प

## (देहारी टाळेख, मुरबाड , ठाणे जिल्हा, महाराष्ट्र)

**१.संदर्भ**

PRI–CBO अभिसरण प्रकल्प महाराष्ट्रात २०२३ ते २०२५ दरम्यान राबविण्यात आला. ठाणे जिल्ह्यात हा प्रकल्प मुरबाड तालुक्यातील ११६ ग्रामपंचायतींमध्ये २४ महिन्यांसाठी कार्यान्वित करण्यात आला. देहारी टाळेख या महसुली गावात १,४११ लोकसंख्या (७६० पुरुष, ६५१ महिला, २२८ कुटुंबे) असून, महिलांचा ग्रामसभेत सहभाग ऐतिहासिकदृष्ट्या कमी होता. काही दीर्घकालीन समस्या जसे की जीर्ण होत चाललेला शवसंस्कार गृह यावर कोणतीही ठोस कारवाई झाली नव्हती.

**२.उपक्रम**

२२ जुलै २०२४ रोजी, दोन दिवसांचे LRP प्रशिक्षण घेतले गेले, जिथे मार्गदर्शक आणि प्रकल्प कर्मचारी PRI–CBO अभिसरणाचे उद्दिष्ट, महिलांचा गाव विकासातील सहभाग, सरकारी योजना, VPRP, GPDP आणि रोजगार हमी कार्यक्रम यांचा आढावा दिला. प्रशिक्षणानंतर, देहारी टाळेख येथे महिला संघांना त्यांच्या अधिकारांविषयी, उपलब्ध योजना आणि ग्रामसभेतील सहभागाचे महत्त्व समजावून सांगण्यासाठी जनजागृती सत्रांचे आयोजन केले गेले.

२९ डिसेंबर २०२४ रोजी ग्रामपंचायत कार्यालयात PRI परिचय सत्र आयोजित केले गेले, जिथे सरपंच, वॉर्ड सदस्य, ग्रामसेवक, आंगणवाडी वर्कर, आशा कार्यकर्त्या आणि VO सदस्य उपस्थित होते. या सत्रात PRI–CBO अभिसरण प्रकल्पाची उद्दिष्टे स्पष्ट केली गेली, ग्रामपंचायत व CBO यांच्यातील सहयोग महत्त्वाचा असल्याचे अधोरेखित केले गेले, जेणेकरून दारिद्र्य कमी करता येईल आणि गावाचा सर्वांगीण विकास साधता येईल. महिलांना त्यांच्या VPRP मागण्यांचा GPDP नियोजनाशी कसा समन्वय साधता येईल हे मार्गदर्शन केले गेले.






२७ जानेवारी २०२५ रोजी ग्रामसभा आयोजित केली गेली, जिथे ९७ महिला व १९ पुरुष उपस्थित होते. उपस्थितांनी गावाचा नकाशा पाहून अंतर्गत रस्ते, साठलेले पाणी, कचरा खड्डे, रस्त्यावरील दिवे, विहिरी, शाळेची दुरुस्ती, आंगणवाडी विषयक समस्या आणि दीर्घकाळापासून प्रलंबित शवसंस्कार गृह समस्याअशा मुद्द्यांची यादी तयार केली.

ग्रामसभेत महिलांचा सक्रिय सहभाग आणि सामूहिक मागणी मांडण्याची तयारी हा प्रक्रियेत एक महत्वाचा बदल ठरला. महिलांचे आत्मविश्वास व संकल्प वाढल्यामुळे, त्यांनी मोठ्या संख्येने ग्रामसभेत उपस्थित राहून खुलेपणाने आपले मुद्दे मांडले, स्पष्टता आणि संघटित पद्धतीने मागण्या सादर केल्या. त्यांचा दृश्यमान सहभाग आणि एकजुटीचा आवाज ग्रामसभेला केवळ औपचारिक बैठकीऐवजी वास्तविक निर्णय घेण्याचे व्यासपीठ बनवण्यात मदत करणारा ठरला. ग्रामपंचायतीला समुदायाच्या मागण्यांची नोंद घेऊन कारवाई करावी लागली.

## ३.परिणाम / साध्ये

- महिलांचा ग्रामसभेत सक्रिय सहभाग प्रथमच दिसला, ज्यामुळे नियोजन व निर्णय प्रक्रियेत त्यांचा ठोस सहभाग सुनिश्चित झाला.
- पायाभूत सुविधांमध्ये सुधारणा: अंतर्गत रस्ते कामे, वसुंधरा योजनेअंतर्गत गावातील तलाव स्वच्छता, रस्त्यावरील दिवे १५व्या वित्त आयोग निधीतून बसविले गेले.
- स्थानिक पर्यटनाला चालना देण्यासाठी सेल्फी पॉईंट्स व ऐतिहासिक माहिती फलक बसविण्यात आले.
- पाण्याची पुरवठा दुरुस्ती मंजूर; ४६ लाख रुपये निधी उपलब्ध.
- महिलांसाठी रोजगार-संवर्धन: महिला संघ उपक्रमांसाठी १५व्या वित्त आयोगातून ८०,००० रुपये मंजूर.
- शवसंस्कार गृहाचे नूतनीकरण मंजूर; ८.४ लाख रुपये बजेट; मार्च २०२५ मध्ये बांधकामास सुरुवात.
- ग्रामपंचायत, महिला संघ आणि PRI–CBO अभिसरण यंत्रणा यांच्यात स्थायी विकासासाठी मजबूत दुवा निर्माण झाला.





## ४.पुढील दिशा

महिला ग्राम सतत समृद्धी आराखडा आणि ग्राम विकास आराखड्याच्या माध्यमातून गावाच्या नियोजन आणि विकास प्रक्रियेत सक्रियपणे सहभागी राहतील. ग्रामपंचायतीच्या सातत्यपूर्ण मार्गदर्शनाखाली, त्या स्थानिक समस्यांची योग्य पद्धतीने मांडणी करणे, उपाययोजना सुचवणे आणि समुदाय विकासाच्या उपक्रमांची अंमलबजावणी सुनिश्चित करण्यासाठी आत्मविश्वास प्राप्त करतील. या वाढलेल्या सहभागामुळे स्थानिक प्रशासन अधिक मजबूत होईल आणि दीर्घकालीन, सर्वसमावेशक गाव विकासाला चालना मिळेल.

## यशोगाथा १६: “सशक्त महिला, प्लास्टिकमुक्त गाव”
### (गेवरधा ग्रामपंचायत, ता. कुरखेडा, जि. गडचिरोली)

### १.संदर्भ

गेवरधा हे कुरखेडा तालुक्यापासून सुमारे ६ किमी अंतरावर वसलेले आदिवासी बहुल गाव असून, गावाची लोकसंख्या सुमारे २,००८ आहे. गावात शेती व मजुरी हे प्रमुख उपजीविकेचे स्रोत असून, स्थानिक पातळीवर समुदायामध्ये एकोप्याची व परस्पर सहकार्याची परंपरा दिसून येते. विविध शासकीय उपक्रमांमुळे गावात विकास प्रक्रियेला गती मिळण्यास सुरुवात झाली आहे.

या पार्श्वभूमीवर, सामाजिक व विकास प्रक्रियेत महिलांची उपस्थिती हळूहळू वाढत असली तरी निर्णयप्रक्रियेत त्यांचा अधिक सक्रिय आणि प्रभावी सहभाग वाढविण्याची संधी उपलब्ध होती. त्यामुळे महिलांच्या नेतृत्वाला चालना देणे आणि त्यांचा सहभाग अधिक बळकट करणे आवश्यक होते.




छायाचित्र : प्लास्टिक कचरा संकलनाच्या बदल्यात प्रोत्साहन म्हणून साखर वितरण करताना ग्रामपंचायत सदस्य व ग्रामस्थ, ता. कुरखेडा, जि. गडचिरोली

### २.उपक्रम

PRI–CBO अभिसरण प्रकल्पांतर्गत प्रत्येक ग्रामपंचायतीतून स्थानिक संसाधन व्यक्ती (LRP) निवडण्यात आल्या असून, त्यांना गावस्तरीय अभिसरण, सामाजिक जनजागृती, वर्तन बदल संवाद आणि समुदाय संघटन या विषयांवर सखोल प्रशिक्षण देण्यात आले.

गेवरधा ग्रामपंचायतीत माहेर प्रभाग संघाच्या कुसुम कृष्णा मस्के (ICRP व LRP) यांच्या पुढाकारातून ग्राम सतत समृद्धी आराखडा (VPRP) च्या माध्यमातून आरोग्य, पोषण, व्यसनमुक्ती आणि पर्यावरण संरक्षण या विषयांवर विविध उपक्रम राबविण्यात आले. स्वयं-सहाय्यता समूहांच्या बैठका, घरभेटी, ग्रामसभा जनजागृती, युवकांचा सहभाग आणि ग्रामपंचायतीसोबत सातत्यपूर्ण संवाद यांद्वारे व्यापक जनजागृती करण्यात आली.

गावातील वाढत्या प्लास्टिक समस्येवर उपाय म्हणून महिला स्वयं-सहाय्यता समूह व ग्रामसंघ यांनी एकत्रितपणे पुढाकार घेतला. घरगुती स्तरावर प्लास्टिक कचरा वेगळा संकलित करणे, सार्वजनिक ठिकाणी प्लास्टिक टाकणे टाळणे आणि संकलित कचऱ्याचे केंद्रीकृत व्यवस्थापन करणे याबाबत ग्रामसभेत ठराव मंजूर करण्यात आला.

यासोबतच, ग्रामपंचायतीशी प्रभावी अभिसरण साधून प्रोत्साहनाधारित यंत्रणा विकसित करण्यात आली. प्रत्येक घरातून १ किलो प्लास्टिक कचरा जमा केल्यास १ किलो साखर प्रोत्साहन म्हणून देण्याचा निर्णय घेण्यात आला. तसेच ग्रामसंघामार्फत संकलित प्लास्टिक ५ रुपये प्रति किलो दराने खरेदी करण्याची व्यवस्था करण्यात आली, ज्यामुळे गावातील प्रत्येक कुटुंबाचा सक्रिय सहभाग सुनिश्चित झाला.

## ३. परिणाम

या उपक्रमामुळे गेवरधा गावात सामाजिक व पर्यावरणीय परिवर्तनाची प्रक्रिया सुरू झाली. पहिल्याच टप्प्यात सुमारे ८५ किलो प्लास्टिक कचरा संकलित झाला आणि १०० हून अधिक कुटुंबांनी सक्रिय सहभाग नोंदविला. उपक्रमाचे ठळक परिणाम पुढीलप्रमाणे आहेत:

- सार्वजनिक ठिकाणी प्लास्टिक कचऱ्याचे प्रमाण लक्षणीयरीत्या घटले.
- प्लास्टिक पॅकेटांच्या वेष्टनांची उघडपणे टाकण्याची प्रवृत्ती कमी झाली.
- महिलांच्या पुढाकारामुळे ग्रामपंचायत व महिला संस्थांमधील समन्वय अधिक दृढ झाला.
- स्वयं-सहाय्यता समूहांमधील महिलांमध्ये नेतृत्वगुण, सामूहिक निर्णयक्षमता आणि सामाजिक जबाबदारीची जाणीव विकसित झाली.
- पर्यावरणपूरक पर्याय स्वीकारण्याची मानसिकता समुदायामध्ये निर्माण झाली.
- नियमित प्लास्टिकमुक्त स्वच्छता अभियानाची सुरुवात झाली.
- संकलित प्लास्टिकचे पुनर्प्रक्रिया केंद्राकडे प्रेषण सुरू झाल्यामुळे उपक्रमाचा दीर्घकालीन टिकाऊपणा सुनिश्चित झाला.

या प्रक्रियेमुळे गावपातळीवर महिलांचे नेतृत्व अधिक प्रभावी झाले असून, ग्रामविकास प्रक्रियेत त्यांचा सक्रिय सहभाग दृढ झाला आहे.

## ४. पुढील दिशा

प्लास्टिकमुक्त गावाच्या दिशेने सुरू असलेल्या या उपक्रमाला अधिक बळकटी देण्यासाठी स्वयं-सहाय्यता समूह, ग्रामसंघ आणि ग्रामपंचायत यांच्यातील समन्वय अधिक दृढ करण्यावर भर देण्यात येणार आहे. प्रत्येक घरात कचरा वर्गीकरणाची सवय रूजविणे, शाळा व युवकांचा सहभाग वाढविणे आणि पुनर्प्रक्रिया व्यवस्थेला अधिक संस्थात्मक स्वरूप देणे ही पुढील प्रमुख उद्दिष्टे असतील.

महिलांच्या नेतृत्वाखाली पर्यावरणीय जबाबदारीची संस्कृती दृढ करण्यासाठी सातत्यपूर्ण प्रयत्न करण्यात येतील. या प्रक्रियेमुळे महिलांचे सामाजिक सशक्तीकरण अधिक बळकट होईल आणि गेवरधा ग्रामपंचायत पर्यावरण संरक्षणाच्या दृष्टीने आदर्श गाव म्हणून विकसित होईल.

# यशोगाथा १७: “ग्रामसभेपासून ग्रामविकासापर्यंत: उपजीविकेच्या संधींनी सशक्त महिला”

**(सेवाग्राम ग्रामपंचायत, वर्धा तालुका, वर्धा जिल्हा, महाराष्ट्र)**




## १.संदर्भ

वर्धा जिल्ह्यातील सेवाग्राम गावात ग्रामपंचायतीची औपचारिक नियोजन प्रक्रिया कार्यरत असून, ग्रामविकास आराखड्यांच्या माध्यमातून विविध विकास उपक्रम राबविले जात आहेत. या प्रक्रियेला अधिक सर्वसमावेशक बनविण्यासाठी गरीब कुटुंबे आणि महिला यांचा सहभाग वाढविण्याची संधी उपलब्ध होती, जेणेकरून त्यांच्या गरजा आणि प्राधान्यक्रम अधिक प्रभावीपणे ग्रामपंचायत विकास आराखड्यात (GPDP) समाविष्ट होतील.

रोशनी गणेश साठोकर यांचा प्रवास या सकारात्मक बदलाच्या प्रक्रियेला अधोरेखित करतो. वर्धा जिल्ह्यातील अल्लीपूर परिसरातील साधारण आर्थिक पार्श्वभूमी असलेल्या कुटुंबात वाढलेल्या रोशनी यांनी विविध जीवनानुभवातून पुढे जाण्याची जिद्द जोपासली. २०११ मध्ये विवाहानंतर त्यांनी कौटुंबिक जबाबदाऱ्या समर्थपणे सांभाळत स्थानिक उपजीविकेच्या संधींमध्ये स्वतःला जुळवून घेतले.

२०१३ मध्ये जीजामाता स्वयं-सहाय्यता गटात सहभागी होणे हा त्यांच्या आयुष्यातील महत्त्वपूर्ण टप्पा ठरला. या माध्यमातून त्यांना सामूहिक कृती, परस्पर सहकार्य आणि स्थानिक पातळीवरील विकास प्रक्रियेत सहभागी होण्याची संधी मिळाली. अंगणवाडी सेवा, पाणी व नाली व्यवस्थापन यांसारख्या विषयांमध्ये सुधारणा घडवून आणण्यासाठी समुदायाच्या गरजा अधिक संघटित आणि रचनाबद्ध पद्धतीने मांडण्याची दिशा यामुळे निर्माण झाली.



**२.उपक्रम**

PRI–CBO अभिसरण प्रकल्पातील सहभागामुळे रोशनी यांचा प्रवास स्वयं-सहाय्यता गट (SHG) सदस्यापासून आत्मविश्वासपूर्ण स्थानिक संसाधन व्यक्ती (LRP) पर्यंत विकसित झाला. ग्राम सतत समृद्धी आराखडा (VPRP) च्या प्रक्रियेत त्यांनी ग्रामसंघाच्या नेतृत्वाखाली गावातील आरोग्य, पाणी आणि स्वच्छतेशी संबंधित बाबी ओळखण्यासाठी सार्वजनिक स्थळी रांगोळी सारख्या सुलभ साधनांचा वापर करून गाव नकाशा सत्रांचे आयोजन केले. या उपक्रमांमुळे विविध स्थानिक मुद्दे समुदायाच्या चर्चेत आले आणि त्याबाबत सामूहिक समज निर्माण झाली.

या सामूहिक प्रक्रियेच्या आधारावर रोशनी यांनी ग्राम सतत समृद्धी आराखडा (VPRP) तयार करण्यास सहकार्य केले, ज्यामध्ये समुदायाच्या गरजा व प्राधान्यक्रम स्पष्ट मागण्यांमध्ये रूपांतरित झाले. या मागण्या ग्रामसंघातील महिलांच्या माध्यमातून ग्रामसभेत मांडण्यात आल्या तसेच ग्रामपंचायत विकास आराखड्यात (GPDP) समावेशासाठी सादर करण्यात आल्या.

यासोबतच, रोशनी यांनी प्रशिक्षणाच्या माध्यमातून गावस्तरीय संस्थांचे पुनरुज्जीवन करण्यासाठीही महत्त्वपूर्ण भूमिका बजावली. ग्रामसंघाच्या नेतृत्वाखाली शाळा व्यवस्थापन समिती (SMC) आणि अंगणवाडी देखरेख समिती (ALMSC) पुन्हा सक्रिय करण्यासाठी विविध उपक्रम राबविण्यात आले. पालकांना निर्णय प्रक्रियेत सहभागी होण्यासाठी प्रोत्साहित करण्यात आले. १५ ऑगस्ट २०२५ रोजी समुदायाच्या सहभागातून शाळेतील जुन्या सायकली दुरुस्त करून विद्यार्थ्यांच्या उपयोगासाठी उपलब्ध करून देण्याचा निर्णय घेण्यात आला, ज्यामुळे शिक्षणाच्या सुविधा अधिक सुलभ झाल्या.

रोशनी यांनी समाजातील विविध घटकांचा समावेश सुनिश्चित करण्यावरही भर दिला. वृद्ध व्यक्तींसाठी स्वतंत्र बैठकांचे आयोजन करण्यात आले तसेच किशोरी गटाची स्थापना करून मुलींना शिक्षण, आरोग्य आणि त्यांच्या अपेक्षांबाबत संवाद साधण्यासाठी व्यासपीठ उपलब्ध करून देण्यात आले. याशिवाय, शाश्वत उपजीविकेच्या दृष्टीने त्यांनी पाणी फाउंडेशन व तज्ज्ञांच्या सहकार्याने कमी खर्चिक व शाश्वत शेती पद्धतींचा प्रसार करण्यास पुढाकार घेतला.

## ३. परिणाम

सहभागी नियोजन आणि संस्थात्मक सहभागाच्या प्रक्रियेमुळे सेवाग्राममध्ये लक्षणीय आणि सकारात्मक बदल घडून आले. रोशनी यांच्या वैयक्तिक प्रवासातही या प्रक्रियेचा ठोस प्रभाव दिसून आला. गाईपालन उपक्रम एका गाईपासून सुरू होऊन हळूहळू लघु उत्पन्नक्षम उपक्रमात विकसित झाला, ज्यामुळे कुटुंबाच्या उत्पन्नात वाढ झाली आणि कौटुंबिक वातावरणात सकारात्मक बदल घडले. त्यांच्या सातत्यपूर्ण प्रयत्नांमुळे कुटुंबाचा दृष्टिकोनही अधिक सहकार्यपूर्ण झाला. LRP म्हणून कार्य करत असताना त्यांनी १२ वी परीक्षा उत्तीर्ण करून शिक्षणाबाबतची आपली जिद्द आणि आत्मविश्वास सिद्ध केला.

समुदाय स्तरावरही VPRP प्रक्रियेमुळे ठोस आणि मोजता येणारे परिणाम दिसून आले. गरजू कुटुंबे व एकल महिलांसाठी घरकुल योजनेअंतर्गत सुविधा उपलब्ध झाल्या. तसेच, ११ महत्त्वपूर्ण सामुदायिक मागण्या सन २०२५–२६ च्या ग्रामपंचायत विकास आराखड्यात (GPDP) समाविष्ट करण्यात आल्या. सामाजिक सुरक्षा सेवांपर्यंत पोहोच वाढून २०० हून अधिक कुटुंबांना आरोग्य कार्ड प्राप्त झाले, तसेच पात्र कुटुंबांना रोजगाराशी संबंधित सुविधा उपलब्ध करून देण्यात आल्या.

विशेषतः वंचित व दुर्लक्षित घटकांपर्यंत योजनांचा लाभ पोहोचविण्यावर भर देण्यात आला, ज्यामुळे पूर्वी वगळल्या गेलेल्या महिलांनाही शासकीय योजनांमध्ये समाविष्ट होता आले. रोशनी यांच्या समन्वयपूर्ण, सुसंगत आणि सर्वसमावेशक कार्यपद्धतीला ब्लॉक व जिल्हा स्तरावरील संसाधन व्यक्तींनीही सकारात्मक दखल दिली असून, त्यांच्या कामातील स्पष्टता, संघटन कौशल्य आणि परिणामकारकता विशेष उल्लेखनीय ठरली आहे.





## ४. पुढील दिशा

रोशनी PRI-CBO अभिसरण प्रकल्पाला उपक्रम मानत नाहीत, तर आपल्या गावाप्रती चालू जबाबदारी म्हणून पाहतात. त्या ग्राम आरोग्य, पोषण व स्वच्छता समिती तसेच इतर गावस्तरीय संस्थांना बळकटी देण्यास कटिबद्ध आहेत. त्यांचा प्रवास दाखवतो की, VPRP सारखी सहभागी योजना आणि समर्पित समुदाय नेतृत्व एकत्र आल्यास शासन प्रणाली दूरच्या व्यवस्थेतून संवेदनशील आणि प्रतिसादक्षम प्रक्रियेत रूपांतरित होऊ शकते. रोशनी ताईंच्या मते, पुढील वाटचाल इतरांशी स्पर्धा करण्याबाबत नाही, तर स्वतःच्या सामर्थ्याची सातत्याने पडताळणी करण्याबाबत आहे.







छायाचित्र : रोशनी ताईंचा प्रवास आणि विविध ग्रामविकास उपक्रमांची छायाचित्रे











छायाचित्र : रोशनी ताईंचा प्रवास आणि विविध ग्रामविकास उपक्रमांची छायाचित्रे

# यशोगाथा १८: - "गृहिणीपासून ग्रामविकासाच्या नेतृत्वापर्यंत
## (वेतोशी ग्रामपंचायत, रत्नागिरी तालुका, रत्नागिरी जिल्हा)

### १.संदर्भ

रत्नागिरी जिल्ह्यातील वेतोशी या गावात पूजा गुरुनाथ घावळी यांचे आयुष्य पूर्वी एका सामान्य गृहिणीप्रमाणे घर आणि कुटुंब यापुरते मर्यादित होते. स्वतःच्या क्षमतांची जाणीव असूनही त्यांना सार्वजनिक कामात सहभागी होण्याची संधी कधी मिळाली नव्हती. सन 2019 मध्ये उमेद अभियानांतर्गत गावात स्वयं सहाय्यता समूहाची माहिती देण्यात आली आणि महिलांना एकत्र येऊन बचत, आर्थिक शिस्त आणि सामाजिक सहभाग याबाबत मार्गदर्शन करण्यात आले. त्या दिवशी पूजा ताईंच्या आयुष्यात बदलाची बीजे रोवली गेली.

अकरा महिलांनी एकत्र येऊन समूह स्थापन केला आणि पूजा ताईंनी सचिव म्हणून जबाबदारी स्वीकारली. हळूहळू समूहाच्या कामातून त्यांचा आत्मविश्वास वाढू लागला. केवळ नोंदी ठेवणारी महिला म्हणून नव्हे, तर इतर महिलांना समजावून सांगणारी, मार्गदर्शन करणारी नेतृत्त्वशील व्यक्ती म्हणून त्यांची ओळख निर्माण झाली. पुढे ग्रामसंघात लेखापाल आणि त्यानंतर CRP म्हणून त्यांनी काम करताना महिलांमध्ये संघटन, शिस्त आणि आर्थिक साक्षरता वाढवली. सन 2024 मध्ये PRI-CBO अभिसरण प्रकल्पांतर्गत त्यांची LRP म्हणून निवड झाली आणि त्यांच्या कार्याचा नवा अध्याय सुरू झाला.



**२.उपक्रम**

LRP म्हणून काम करताना त्यांनी गावाकडे केवळ योजना राबवण्याच्या दृष्टीने पाहिले नाही, तर गावाच्या सर्वांगीण विकासाची जबाबदारी म्हणून पाहिले. VO ओरिएंटेशनच्या माध्यमातून महिलांना ग्रामविकास प्रक्रियेची माहिती देताना त्यांनी प्रत्येक महिलेला बोलते केले. गावाचा विकास ही आपली "सामूहिक जबाबदारी आहे" ही जाणीव त्यांनी महिलांच्या मनात रुजवली.

ग्राम सतत समृद्धी आराखड्या अंतर्गत गाव नकाशा काढताना त्यांनी महिलांसोबत गावातील रस्ते, पाणी, आरोग्य, शिक्षण, पोषण यांसंबंधी चर्चा केली. रांगोळीच्या माध्यमातून नकाशे काढताना महिलांच्या डोळ्यांत प्रथमच आपल्या गावाबद्दल निर्णय घेण्याचा अधिकार दिसत होता. त्या प्रक्रियेतून तयार झालेला विकास आराखडा हा केवळ कागदावरील दस्तऐवज नव्हता; तो गावातील महिलांच्या स्वप्नांना दिशा देणारा, त्यांच्या अपेक्षा आणि हक्कांना आवाज देणारा सामूहिक कृतीनकाशा होता.

पूर्वी नागरी समित्या अस्तित्वात असूनही त्यांच्या कार्याला अधिक प्रभावीपणे गती देण्याची संधी होती. LRP ताईंनी पुढाकार घेत या समित्यांना नवसंजीवनी दिली आणि त्यांना अधिक सक्षम व सक्रिय बनविण्यासाठी प्रयत्न केले. शाळा व्यवस्थापन समिती, अंगणवाडी समिती तसेच आरोग्य, पोषण, पाणीपुरवठा आणि स्वच्छता समित्यांना आवश्यक प्रशिक्षण देण्यात आले, ज्यामुळे त्यांच्या भूमिका आणि जबाबदाऱ्या अधिक स्पष्ट झाल्या आणि कार्यप्रणाली अधिक परिणामकारक बनली.

ग्रामपंचायत आणि समुदाय यांच्यात परिणामकारक समन्वय निर्माण व्हावा यासाठी LRP ताईंनी GPCC आणि VOCC स्थापन करण्यास पुढाकार घेतला, ज्यामुळे संवाद आणि निर्णयप्रक्रिया अधिक सुसंगत झाली. त्याचबरोबर महिलांना आरोग्य कार्ड, जॉब कार्ड, रेशन कार्ड, वृद्धापकाळ योजना यांसारख्या विविध हक्काच्या योजनांचा लाभ मिळवून देताना त्यांनी प्रत्येक प्रकरणाकडे संवेदनशीलतेने पाहत कुटुंबांच्या गरजा लक्षात घेत सातत्याने पाठपुरावा केला.



## ३. परिणाम

या सातत्यपूर्ण प्रयत्नांमुळे गावात लक्षणीय बदल घडू लागले. पूर्वी ग्रामसभेला फारशा महिला उपस्थित राहत नव्हत्या; आज ग्रामसभा 100% कोरमने भरते आणि महिला आत्मविश्वासाने आपले मत मांडतात. गावातील 11 पायाभूत सुविधांच्या मागण्यांची नोंद ग्रामसभेत करून GPDP 2025-26 च्या विकास आराखड्यात त्यांचा समावेश झाला आणि मागण्या प्रत्यक्ष पूर्णही झाल्या. विकास आता केवळ चर्चेपुरता मर्यादित न राहता प्रत्यक्षात दिसू लागला.

चार महिलांना घरकुलाचा लाभ मिळाला - ज्या कुटुंबांकडे सुरक्षित निवाऱ्याचे स्वप्नही नव्हते, त्या कुटुंबांच्या आयुष्यात स्थैर्य आले. 894 महिलांचे आरोग्य कार्ड काढण्यात आले, 12 जॉब कार्ड मंजूर झाले आणि 5 महिलांना वृद्धापकाळ योजनेचा लाभ मिळाला. एका निराधार महिलेला नवीन रेशनकार्ड मिळवून देऊन तिच्या जगण्याला आधार मिळाला.

विशेष उल्लेखनीय म्हणजे 333 महिला शेतकऱ्यांना फार्मर आयडी काढून देण्यात आले. यामुळे त्या अधिकृत शेतकरी म्हणून शासनाच्या कृषी योजनांसाठी पात्र ठरल्या. पूर्वी केवळ कुटुंबातील पुरुषांच्या नावावर ओळख असलेल्या या महिला आता स्वतःच्या हक्काने शेतकरी म्हणून उभ्या राहिल्या. ही केवळ नोंदणी नव्हती, तर त्यांच्या ओळखीचा आणि सन्मानाचा पुनर्जन्म होता.

अंगणवाडी व शाळेच्या मागण्या पूर्ण झाल्यामुळे मुलांना खेळणी व आवश्यक सुविधा उपलब्ध झाल्या. गावातील नागरी समित्या सक्रिय झाल्या आणि ग्रामसभा 100% कोरमने भरू लागली. पूर्वी संकोचाने बसणाऱ्या महिला आता आत्मविश्वासाने आपले मत मांडू लागल्या.
सर्वात मोठा बदल आकडेवारीत नाही, तर महिलांच्या डोळ्यांत दिसणाऱ्या आत्मविश्वासात आहे. ज्या महिला निर्णयप्रक्रियेपासून दूर होत्या, त्या आज गावाच्या विकासाचा अजेंडा ठरवत आहेत.

## ४. पुढील दिशा

LRP ताईंसाठी हा प्रवास केवळ पदाचा नव्हता; तो स्वतःला शोधण्याचा होता. “मी करू शकते” ही जाणीव त्यांच्या मनात दृढ झाली आणि गावाने त्यांना एक सामाजिक नेतृत्व म्हणून स्वीकारले. आज आमच्या LRP ताईंचा निर्धार अधिक दृढ आहे. PRI-CBO अभिसरण प्रकल्पाच्या माध्यमातून गावातील प्रत्येक महिलेला तिच्या हक्काच्या योजनांचा लाभ मिळवून देणे, ग्रामसभा आणि नागरी समित्या अधिक सक्षम करणे आणि गावाच्या विकासात महिलांचे नेतृत्व दृढ करणे हेच त्यांचे ध्येय आहे.

त्यांच्या शब्दांत -

**“स्पर्धा कोणाशी नाही; माझे ध्येय एकच आहे - गावाच्या विकासासाठी प्रत्येक योजना महिलांपर्यंत पोहोचवणे.”**









छायाचित्र : ग्राम विकासासाठी एकत्र येऊन चर्चा, विचारविनिमय आणि निर्णय घेताना वेतोशी ग्रामपंचायत सदस्य, ता. रत्नागिरी, जि. रत्नागिरी

# निष्कर्ष

PRI–CBO कृतीसंगम प्रकल्प हा ग्रामस्तरावरील सहभागी, समन्वयाधारित आणि उत्तरदायी शासन व्यवस्थेच्या निर्मितीकडे टाकलेले एक महत्त्वपूर्ण पाऊल ठरले आहे. महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियान (उमेद–MSRLM) आणि कुटुंबश्री NRO यांच्या संयुक्त सहकार्याने राबविण्यात आलेल्या या उपक्रमाने पंचायत राज संस्था (PRI) आणि समुदाय आधारित संस्था (CBO) यांच्यात प्रभावी अभिसरण निर्माण करून ग्रामविकास प्रक्रियेला नवे बळ दिले आहे.

प्रकल्पाच्या माध्यमातून १२ जिल्हे, २४ तालुके आणि १,९२२ ग्रामपंचायतींमध्ये सहभागी नियोजन, ग्रामसभा सक्षमीकरण, महिला सहभाग वाढ, नागरिक समित्यांचे बळकटीकरण आणि विभागीय समन्वय या क्षेत्रांत लक्षणीय प्रगती साधण्यात आली. ग्रामपंचायत समन्वय समित्या (GPCC), ग्राम संघ समन्वय समित्या (VOCC), तसेच SMC, VHSNC आणि ALMSC यांसारख्या नागरिक समित्यांच्या सक्रिय सहभागामुळे स्थानिक शासन प्रक्रिया अधिक लोकाभिमुख, पारदर्शक आणि परिणामकारक बनली आहे.

या प्रकल्पाची सर्वात मोठी उपलब्धी म्हणजे समुदायामध्ये निर्माण झालेली स्वामित्वाची भावना आणि महिलांचा वाढलेला आत्मविश्वास. स्वयंसहाय्यता समूहातील महिलांनी ग्रामसभांमध्ये सक्रिय सहभाग घेत निर्णय प्रक्रियेत आपली प्रभावी भूमिका सिद्ध केली. श्रमदान, विशेष ग्रामसभा, नागरिक समित्यांच्या बैठका आणि विविध समन्वय उपक्रमांमुळे ग्रामस्तरावर सामूहिक जबाबदारी, सामाजिक ऐक्य आणि विकासाविषयी सकारात्मक दृष्टिकोन निर्माण झाला आहे.

VPRP आणि GPDP यांच्यातील प्रभावी संलग्नतेमुळे ग्रामपातळीवरील गरजा अधिक सक्षमपणे शासन व्यवस्थेपर्यंत पोहोचल्या. विविध विभागांमधील समन्वय बैठका आणि शिबिरांमुळे नागरिकांना शासकीय सेवा व योजनांचा अधिक सुलभ लाभ मिळू लागला. त्यामुळे स्थानिक विकास प्रक्रिया अधिक समन्वित, सहभागी आणि शाश्वत बनण्यास मदत झाली आहे.

ही यशोगाथा पुस्तिका केवळ प्रकल्पातील उपक्रमांचे दस्तऐवजीकरण नसून, सहभागी शासन, महिला सक्षमीकरण आणि समुदाय आधारित विकास यांचे प्रेरणादायी उदाहरण आहे. या अनुभवांच्या आधारे PRI–CBO कृतिसंगम मॉडेलचा विस्तार राज्यातील इतर ग्रामपंचायतींमध्ये अधिक प्रभावीपणे करता येईल, असा विश्वास आहे. भविष्यातही स्थानिक स्वराज्य संस्था आणि समुदाय यांच्यातील समन्वय अधिक बळकट करून ग्रामविकासाची लोकचळवळ अधिक व्यापक करण्याचा संकल्प या प्रकल्पातून दृढ झाला आहे.

उमेद
क्षितिज नवे, विश्वास नवा...

Kudumbashree National Resource Organisation